दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१२९ | बुधवार दि.२९ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# कर्जमाफीच्या यादीत नाव नसले तरी घाबरू नका...!

## पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळणारच–कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई । प्रतिनिधी

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभार्थी यादीत नाव नसलेल्या पात्र शेतकऱ्यांनी कोणतीही भीती बाळगू नये. आवश्यक कागदपत्रे आणि पडताळणीची प्रक्रिया पूर्ण होताच त्यांचा यादीत समावेश केला जाईल. राज्यातील एकाही पात्र शेतकऱ्यावर अन्याय होऊ दिला जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. यवतमाळ जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने कर्जमाफीच्या यादीत नाव न आल्याच्या नैराश्यातून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आल्यानंतर राज्यभर चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांना संयम राखण्याचे आवाहन करत, अपूर्ण कागदपत्रे किंवा पडताळणीमुळे नाव यादीत नसले तरी घाबरण्याचे कारण नसल्याचे स्पष्ट केले.**



भरणे यांनी सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. लाभार्थी याद्या टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध केल्या जात असून, प्रत्येक शेतकऱ्याच्या कागदपत्रांची आणि कर्जाची पडताळणी झाल्यानंतर त्याचे नाव यादीत समाविष्ट केले जात आहे. ज्या शेतकऱ्यांची कागदपत्रे अद्याप पूर्ण झालेली नाहीत किंवा पडताळणी सुरू आहे, त्यांची नावे पुढील याद्यांमध्ये प्रसिद्ध केली जातील. त्यामुळे सुरुवातीच्या यादीत नाव नसल्यास शेतकऱ्यांनी कोणताही चुकीचा निर्णय घेऊ नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीक कर्ज माफ करण्यात येणार आहे. मात्र, काही लाभार्थ्यांच्या नावासमोर प्रत्यक्ष थकबाकीपेक्षा कमी रक्कम नमूद झाल्याच्या तक्रारी राज्यातील विविध भागांतून येत आहेत. या मुद्द्यावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार कैलास पाटील यांनी सरकारचे लक्ष वेधले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना कृषिमंत्री ▶▶ पान २ वर

### शेतकऱ्यांना संयमाचे आवाहन

कर्जमाफीच्या प्रक्रियेत कोणताही पात्र शेतकरी वंचित राहणार नाही. आवश्यक कागदपत्रे पूर्ण करून प्रशासनाला सहकार्य करावे आणि कोणत्याही प्रकारच्या अफवा किंवा अपूर्ण माहितींवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. तसेच, शेतकऱ्यांच्या तक्रारी गांभीर्याने घेऊन त्यांचे तत्काळ निराकरण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### राज्यात ८ नवीन न्यायालये स्थापन होणार

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंड३ळाच्या बैठकीत विविध विभागांशी संबंधित महत्त्वाच्या निर्णयांना मंजुरी देण्यात आली. न्यायव्यवस्था अधिक सक्षम करणे, विकासकामांना गती देणे आणि प्रशासनाची कार्यक्षमता वाढवणे या उद्देशाने सरकारने एकूण ८ महत्त्वाचे निर्णय घेतले. यामध्ये राज्यात ८ नवीन न्यायालये स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही समाविष्ट आहे. न्यायव्यवस्थेवरील वाढता ताण कमी करण्यासाठी आणि नागरिकांना जलद न्याय मिळावा यासाठी विविध ठिकाणी नवीन न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### पराभव दिसल्यानेच मोदींचा दौरा रद्द–तेजस्वी यादव

पाटणा : बांकेपूर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचा पराभव निश्चित असल्याचे आणि विद्यार्थ्यांमधील असंतोष पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपला बिहार दौरा रद्द केला, असा थेट दावा राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी केला आहे. पंतप्रधान एका पुलाचे उद्घाटन करण्यासाठी बिहारमध्ये येणार होते, परंतु पराभवाच्या भीतीपोटी त्यांनी हा दौरा रद्द केल्याचा आरोप त्यांनी केला. या दौऱ्याबाबत भाजप किंवा राज्य सरकारकडून ( ) कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या बांकेपूर विधानसभेच्या जागेसाठी ३० जुलै रोजी मतदान होणार आहे. या जागेवर आरजेडडीने गेल्या निवडणुकीतील उपविजेत्या रेखा गुप्ता यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, या पोटनिवडणुकीत जन सुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर आणि भाजपचे उमेदवार नीरा कुमार सिन्हा यांच्यात प्रमुख लढत मानली जात आहे.

### जेन झी' भावुक पण शांत विचार करत नाही–भागवत

हैदराबाद : 'जेन झी' ही पिढी अत्यंत भावुक आणि परिस्थितीनुसार जुळवून घेणारी आहे; परंतु ती शांत मनाने विचार करत नाही, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक मोहन भागवत यांनी रविवारी येथील एका कार्यक्रमात व्यक्त केले. युवा पिढीच्या स्वभावाचे विश्लेषण करताना भागवत म्हणाले, 'जेन झी' ही पिढी चांगली आहे. त्यांच्यात परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता आहे आणि ते स्वभावाने भावुक आहेत. मात्र, ते खूप शांत मनाने विचार करत नाहीत. त्यांच्या संपर्कात येणारी कोणतीही गोष्ट जर त्यांना स्पष्टपणे प्रामाणिक आणि खरी वाटली, तर ती त्यांना लगेच आकर्षित करते. कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) नेतृत्वाखाली झालेल्या विद्यार्थी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर भागवत यांचे हे विधान आले आहे. आपल्या भाषणात मोहन भागवत यांनी 'एलजीबीटीक्यू प्लस' समुदायाबद्दलही सविस्तर भाष्य केले. हा समुदाय भारतीय समाजाचाच एक भाग असून त्यांना समाजापासून वेगळे किंवा बहिष्कृत केले जाऊ नये, असे मत मांडून ते म्हणाले, 'एलजीबीटीक्यू प्लस' आणि यासारखे समुदाय आपल्या समाजात अस्तित्वात आहेत. अशा प्रवृत्ती मानवी समाजात नेहमीच राहिल्या आहेत.

# केंद्राने आश्वासनानुसार एफआयआर मागे घ्यावेत!

## 'कॉकरोच जनता पार्टी'ची मागणी, सर्वोच्च न्यायालयाच्या अटी अमान्य



दिल्ली । वृतसंस्था

**विद्यार्थी आंदोलकांवर दाखल झालेल्या एफआयआरच्या तपासाला सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर, 'कॉकरोच जनता पार्टी'ने न्यायालयाच्या या अटी अमान्य असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच, चर्चेदरम्यान दिलेले आश्वासन पाळत केंद्र सरकारने आंदोलकांवरील सर्व गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी पक्षाने केली आहे.**

सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास यांनी 'एएनआय'शी बोलताना सांगितले की, सर्वोच्च न्यायालय तरुणांच्या हिताचा विचार करत निर्णय देत असल्याने त्यांच्या निकालाचे स्वागत आहे. मात्र, आंदोलक प्रदीर्घ काळापासून रस्त्यावर उतरून लढा देत असून त्यांच्या मूळ मागण्या मान्य होणे सर्वात महत्त्वाचे आहे. ''आंदोलकांवरील सर्व एफआयआर रद्द केले जावेत आणि ताब्यात घेतलेल्या सर्वांची सुटका व्हावी, ही आमची प्रमुख मागणी होती. याशिवाय केंद्र सरकारने पत्रकार परिषदेत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी,'' असे दास म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आणि केंद्र सरकारने सीजेपीला दिलेले आश्वासन यात तफावत असल्याचे सांगत दास म्हणाले, ''आधीच दाखल झालेले एफआयआर मागे घेतले जाणार नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. पण सरकारसोबत झालेल्या चर्चेत असा निर्णय झाला नव्हता... त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने लादलेल्या अटी आम्हाला मान्य नाहीत.'' सरकारने दिलेला शब्द पाळला नाही, तर सीजेपी पुन्हा एकदा रस्त्यावर ▶▶ पान २ वर

### १८ वर्षाखालील सर्व मुलांना सोडा–सर्वोच्च न्यायालय

झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांना आंदोलकांवर कोणतीही कठोर कारवाई न करण्याचे निर्देश दिले. तसेच, कोणताही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या १८ वर्षांखालील अल्पवयीन आंदोलकांची तात्काळ सुटका करण्याचे आदेश दिले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणाचा निष्पक्ष आणि स्वतंत्र तपास होणे गरजेचे असल्याचे नमूद केले. ''चालू आंदोलनादरम्यान अटक किंवा ताब्यात घेतलेल्या १८ वर्षांखालील अशा सर्व मुलांना सोडून देण्यात यावे, ज्यांच्यावर आधीचे कोणतेही गुन्हे दाखल नाहीत,'' असे स्पष्ट निर्देश खंडपीठाने सर्व राज्यांना दिले आहेत.



# सर्वसामान्यांना फटका ; साखर महागली !

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील साखरेच्या दरात पुन्हा एकदा मोठी वाढ झाली असून घाऊक आणि किरकोळ बाजारात दरांनी उच्चांकी पातळी गाठली आहे. गेल्या महिनाभरात घाऊक बाजारात प्रति क्विंटल ४०० ते ४५० रुपयांची वाढ झाली असून किरकोळ बाजारात साखर प्रतिकिलो ६ ते ७ रुपयांनी महागली आहे. त्यामुळे मोठ्या साखरेचा किरकोळ दर ४९ ते ५१ रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचला असून सणासुदीच्या तोंडावर सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर त्याचा परिणाम होत आहे.

केंद्र सरकारने जुलै महिन्यासाठी देशांतर्गत विक्रीचा साखर कोटा कमी केल्याने बाजारातील पुरवठा मर्यादित झाला आहे. त्याचबरोबर २०२५–२६ च्या गळीत हंगामात साखर उत्पादनात लक्षणीय घट झाली आहे. गेल्या वर्षी २७७ लाख टनांवर असलेले उत्पादन यंदा १९९ लाख टनांवर घसरल्याने कारखान्यांकडील साखरेचा साठाही कमी झाला आहे. परिणामी बाजारात तेजीचे वातावरण कायम आहे.जून–जुलैमध्ये झालेल्या ▶▶ पान २ वर

# सीजेपी आंदोलनातील विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

मुंबई । प्रतिनिधी

नीट पेपरफुटी प्रकरणानंतर देशभरात विद्यार्थ्यांचे आंदोलन उभे राहिले. महाराष्ट्रातही या आंदोलनाचे पडसाद उमटले. आंदोलनादरम्यान काही ठिकाणी पोलिसांनी जमाव पांगवण्यासाठी कारवाई केली होती, तसेच काही आंदोलकांवर गुन्हेही दाखल करण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याबाबत पोलीस प्रशासनाला निर्देश दिल्याची माहिती समोर येत आहे. संबंधित प्रकरणांमध्ये आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून निर्णय घेण्यास सांगण्यात आल्याचेही बोलले जात आहे. दरम्यान, आंदोलनानंतर विद्यार्थ्यांवरील कारवाईबाबत विविध स्तरांतून मागण्या होत होत्या. त्यानंतर राज्य सरकारकडून हा निर्णय घेण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे.

# अतिरिक्त शिक्षकांचे रिक्तपदी समायोजन तातडीने करणार- सीईओ जितिन रहमान

बीड । प्रतिनिधी



**जिल्हा परिषदेच्या शाळेची गुणवत्ता वाढीसाठी विशेष कृती कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. शाळेला भौतिक आणि शैक्षणीक सुविधा देउन गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करून रिक्त पदे तातडीने भरण्यात येणार असल्याची माहिती, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिली.**

यासंदर्भात बोलतांना मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान म्हणाले, यावर्षी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था (डाएट) आणि शिक्षण व विभागाच्या वतीने संयुक्त विद्यमाने कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. नवनियुक्त सर्व केंद्रप्रमुखांना यासंदर्भात एकदिवसीय प्रशिक्षण देण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा नाविन्यपूर्ण, गुणवत्तापूर्ण आहेत. शाळेच्या भौतिक आणि शैक्षणीक सुविधा निर्माण करून ▶▶ पान २ वर

# जिथे लाज वाटायला हवी होती, तिथे उत्सव साजरा केला जातोय!

## एकीकडे मुलगी आत्महत्या करते तर दुसरीकडे माजी शिक्षण मंत्र्यांचे जल्लोषात स्वागत; प्रियंका गांधी कडाडल्या

दिल्ली । वृतसंस्था

माजी शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिल्यानंतर सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी 'जिंदाबाद'च्या घोषणा देत सोमवारी (दि.२८) संसदेत त्यांचे स्वागत केले. एकीकडे महाराष्ट्रात पेपरफुटीने कंटाळलेली तरुण मुलगी आत्महत्या करते तिचे कुटुंब शोकाकूल आहे, तर दुसरीकडे तुम्ही माजी शिक्षणमंत्र्यांचा सत्कार करत आहात! हा कोणता अहंकार आहे? जिथे लाज वाटायला हवी होती, तिथे उत्सव साजरा केला जातोय,'' अशा शब्दांमध्ये काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांनी संसदेत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. लोकसभेत 'परीक्षा सुधारणा विधेयका'वरील चर्चेदरम्यान त्या बोलत होत्या.



तुम्हाला या देशातील तरुणांची एवढी भीती का वाटते? आणि विद्यर्यांवर लाठीहल्ला करून त्यांचा आवाज दाबण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?'' असे सवाल करत ''पंतप्रधानांनी अशा व्यक्तीला शिक्षणमंत्री केले आहे ज्यांनी एका गरोदर महिलेच्या बलात्कार्यांना सोडवण्याचे समर्थन केले होते.
▶▶ पान २ वर

# पर्यावरण संवर्धन हीच पंकजाताईंना खरी वाढदिवसाची भेट -डॉ.योगेश क्षीरसागर

## चौसाळा, शिवणी येथे वृक्षारोपण; पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

बीड । प्रतिनिधी

**ना.पंकजाताई मुंडे या महाराष्ट्राच्या पर्यावरण या महत्वपूर्ण खात्याच्या मंत्री आहेत. त्यांच्या आवाहनाला अनुसरून पर्यावरण संवर्धन करणे हीच पंकजाताई मुंडे यांना खरी वाढदिवसाची खरी भेट आहे. वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा उपक्रम नसून भावी पिढ्यांसाठी हरित भविष्य घडविण्याचा संकल्प आहे. प्रत्येक नागरिकाने झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली, तर पर्यावरण रक्षणाची चळवळ अधिक बळकट होईल, असे प्रतिपादन बीड विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.**



पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड तालुक्यातील चौसाळा येथे सोमवारी (दि.२७) वृक्षारोपण आणि शालेय साहित्य वाटपाचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.क्षीरसागर हे बोलत होते. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा सरचिटणीस देविदास नागरगोजे, जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले, माजी तालुकाध्यक्ष चंद्रकांत फड, शहर मंडळ प्रमुख अशोक लोढा, ग्रामीण मंडळ प्रमुख मनोज पाटील, अशोक रसाळ, यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक नागरिक मोठ्या ▶▶ पान २ वर

### पुढील वर्षी नेतृत्वासोबतच वृक्षांचाही वाढदिवस साजरा करूया–शंकर देशमुख

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हाभर वृक्षारोपण करण्यात आले. आता पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्तही त्याच उत्साहाने हरित उपक्रम राबविले जात आहेत. झाडे लावणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्यांचे संगोपन करणेही आवश्यक आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने लावलेल्या झाडाची जबाबदारी स्वीकारून ते जगविले पाहिजे. पुढील वर्षी नेतृत्वाबरोबरच लावलेल्या वृक्षांचाही वाढदिवस साजरा केला पाहिजे. अशा सातत्यपूर्ण प्रयत्नातून पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ अधिक बळकट होईल, असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी व्यक्त केले.

# रिजर्व्ह बँकेकडे ८८०.५२ मेट्रिक टन सोन्याचा साठा

नवी दिल्ली । वृतसंस्था

**केंद्र सरकारनं मंगळवारी संसदेत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे ८८०.५२ मेट्रिक टन सोन्याचा साठा असल्याची माहिती दिली. मात्र, सरकारनं याचवेळी देशातील धार्मिक ठिकाणांवर आणि कुटुंबाकडे किती सोनं आहे, यासंदर्भातील माहिती नसल्याचं म्हटलं. केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांना एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती राज्यसभेत दिली. २६ जून २०२६ च्या आकडेवारीनुसा भारतीय रिजर्व्ह बँकेकडे ८८०.५२ मेट्रिक टन सोनं आहे.**

पंकज चौधरी म्हणाले की ३१ मार्च २०२५ ला आरबीआयकडे ८७९.५८ मेट्रिकटन सोनं होतं. त्यापूर्वी ३१ मार्च २०२४ ला ८२२.१० मेट्रिक टन सोनं आरबीआयकडे होते. आरबीआयकडे सध्या किती सोनं आहे? देशातील धार्मिक स्थळांवर आणि भारतातील कुटुंबाकडे किती सोनं आहे, याचा अभ्यास केला गेला आहे का असा प्रश्न विचारण्यात आला ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३२.५० क्विंटल | २,६०१ | २,७३६ | २,६६७ |
| ज्वारी/हायब्रिड:३१.०० क्विंटल | २,४७० | २,८०० | २,६४२ |
| मका/लोकल: २०.०० क्विंटल | २,३२३ | २,३२३ | २,३२३ |
| तूर : २.०० क्विंटल | ७,६०१ | ७,६०१ | ७,६०१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी:५२.०० क्विंटल | २,४०० | २,८४० | २,६५७ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ५,००१ | ५,९४० | ५,५०० |

## अग्रलेख

# भांडवलाचे स्वागत, पण विश्वासही तितकाच महत्त्वाचा!

भारतीय रिझर्व्ह बँकेने परकीय गुंतवणुकीच्या नियमांमध्ये व्यापक बदल सुचवले आहेत. गेल्या अनेक वर्षांत वारंवार झालेले दुरुस्ती आदेश, स्पष्टीकरणे आणि गुंतागुंतीच्या अटींमुळे एफडीआय चे नियम अवघड बनले होते. आता त्याऐवजी अधिक सुसंगत, तत्त्वाधारित आणि स्पष्ट नियमावली आणण्याचा प्रयत्न होत आहे. हा बदल स्वागतार्ह असला, तरी केवळ नियम सोपे केल्याने परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढेल, अशी अपेक्षा ठेवणे वास्तववादी ठरणार नाही.

आज भारताकडे जगभरातील गुंतवणूकदारांचे लक्ष आहे. मोठी बाजारपेठ, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि उत्पादन क्षेत्रातील संधी यामुळे भारत आकर्षणाचे केंद्र बनला आहे. मात्र, प्रत्यक्षात भारतात येणाऱ्या निव्वळ एफडीआय मध्ये अपेक्षित वाढ दिसत नाही. कारण जितकी नवीन गुंतवणूक येते, तितक्याच प्रमाणात जुनी गुंतवणूक बाहेरही जात आहे. त्यामुळे भारतासमोरील खरे आव्हान नवीन गुंतवणूक आणण्याइतकेच विद्यमान गुंतवणूकदारांना टिकवून ठेवण्याचे आहे. आरबीआय चे प्रस्तावित नियम व्यवहारातील अनेक संदिग्धता दूर करू शकतात. परकीय गुंतवणूक, पोर्टफोलिओ गुंतवणूक, मालकी हक्क, नियंत्रण, डाउनस्ट्रीम गुंतवणूक यांसारख्या संकल्पनांची स्पष्ट व्याख्या झाल्यास व्यवहार अधिक सुलभ होतील. तसेच विलीनीकरण, अधिग्रहण, पुनर्रचना आणि एक्झिट प्रक्रियेलाही गती मिळू शकते. परंतु गुंतवणूकदार केवळ नियमांकडे पाहून निर्णय घेत नाहीत. त्यांच्यासाठी धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी, कर प्रणालीतील स्थिरता, करारांची प्रभावी अंमलबजावणी, परवानग्यांची जलद प्रक्रिया आणि न्यायव्यवस्थेची विश्वासार्हता तितकीच महत्त्वाची असते. नियम वारंवार बदलणे किंवा विविध सरकारी संस्थांकडून वेगवेगळे अर्थ लावले जाणे, हे गुंतवणूकदारांचा विश्वास कमी करणारे ठरते. परकीय गुंतवणुकीतून काही भांडवल बाहेर जाणे हे नकारात्मकच आहे, असे मानणेही योग्य नाही. परिपक्व गुंतवणूकदार नफा कमावून बाहेर पडतात आणि त्यातून नवीन गुंतवणुकीसाठी जागा निर्माण होते. मात्र, बाहेर जाणाऱ्या भांडवलाच्या तुलनेत नवीन गुंतवणूक कमी होत असेल, तर ती चिंतेची बाब ठरते. भारताला विशेषतः उत्पादन, पायाभूत सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात ग्रीनफिल्ड एफडीआय ची गरज आहे. अशा गुंतवणुकीतून नवीन उद्योग उभे राहतात, रोजगार निर्माण होतो, निर्यात वाढते आणि उत्पादकतेलाही चालना मिळते. केवळ आर्थिक व्यवहार किंवा कंपन्यांच्या खरेदी-विक्रीपुरती गुंतवणूक दीर्घकालीन विकासासाठी पुरेशी ठरत नाही.त्यामुळे आरबीआय चे नियम सुलभ करण्याचे पाऊल योग्य दिशेने टाकलेले असले, तरी ते अंतिम उपाय नाही. केंद्र सरकारची एफडीआय धोरणे, आरबीआय चे नियम आणि विविध नियामक संस्थांची अंमलबजावणी यामध्ये सुसंगती आवश्यक आहे. धोरणात्मक स्थैर्य, पारदर्शकता आणि गुंतवणूकदारांचा विश्वास यांची जोड मिळाल्यासच भारताला दीर्घकालीन आणि शाश्वत परकीय गुंतवणूक आकर्षित करता येईल. सारांश असा की, नियमांची सुलभता ही गुंतवणुकीची दारे उघडते; पण त्या दारातून भांडवल आत येण्यासाठी विश्वास, स्थिर धोरणे आणि पारदर्शक प्रशासन हीच खरी गुरुकिल्ली आहे.

# ना.पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

**बीड । प्रतिनिधी**

वाढदिवस म्हणजे फक्त केक कापणे नाही, तर कुणाच्या तरी आयुष्यात आधार बनणे... हेच आज श्री विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्थाने पुन्हा एकदा दाखवून दिले.कोणताही बडेजाव पणा न करता अत्यंत साध्या पद्धतीने सामाजिक उपक्रमात ताईसाहेब यांचा वाढदिवस साजरा होतो आहे असे प्रतिपादन भाजपाचे नेते सर्जेराव तात्या तांदळे यांनी केले.तर जेष्ठ नेते देविदास नागरगोजे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले हि संस्था लोकनेते गोपिनाथराव मुंडे साहेब यांनी घालुन दिलेल्या सामाजिक सेवेचा वसा आणि वारसा पुढे घेऊन जात आहे. संस्थेची सातत्याने सामाजिक सेवेचे उपक्रम हे प्रेरणादायी व अनुकरणीय आहेत. आज बीड जिल्ह्यातील व व बाहेरील अनेक निराधार आज्जी आजोबा यांना मायेचा मोफत आधार देत आहेत तर अनेक व्यसनी बांधवाला व्यसनमुक्ती कार्य करत आहेत हि प्रेरणादायी बाब आहे असे ते म्हणाले कार्यक्रमात पुढे प्रमुख आथीती भाऊ नाना सुरवसे , भगीरथ आबा बांडे, शामराव राऊत, विनोद तांगडे,अमर सानप



यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले व लाडक्या नेत्या ताईसाहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

महाराष्ट्राच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त घाट सावळीत लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब वृद्धाश्रम व जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र, घाटसावळी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन बीड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष शिवाजीराव भाऊ फड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे प्रमुख चंद्रकांत बाप्पा फड यांनी केले तर नियोजन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन भैय्या यांनी केले होते या मान्यवरांच्या उपस्थितीत आज्जी आजोबा यांच्या हस्ते पंकजाताई मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापण्यात आला . एका बाजूला व्यसनाच्या अंधारातून बाहेर पडण्यासाठी धडपडणाऱ्या रुग्ण मित्रांना आपुलकीने मार्गदर्शन उपस्थित सर्व मान्यवरांकडून मिळाले. या वेळी रुग्ण मित्रांच्या डोळ्यात पुन्हा जगण्याची उमेद दिसत होती. दुसऱ्या बाजूला वृद्धाश्रमातील आजी-आजोबांच्या हातात फळ देताना त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान... ते क्षण शब्दात मांडता येणार नाहीत.मागील वर्षी पंकजाताई साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त लावलेली ३००० झाडे आज मोठी झाली आहेत. त्यांचाही वाढदिवस साजरा केला कार्यकर्त्यांनी त्या झाडांना पाणी घातले, कवटाळले. जणू आपल्या मुलांचाच वाढदिवस साजरा करत आहोत अशी भावना होती. नंतर गोशाळेतील गायींनाही गुळ-घास भरवून त्यांचा वाढदिवस साजरा झाला. पुढे जाग्रत देवस्थान खंडोबा मंदिरातील आरतीच्या घंटानादात संपूर्ण परिसर दुमदुमला. घाट सावळीत फक्त फळे वाटली गेली व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले नाहीत, तर माया वाटली गेली. पुढे गोशाळा येथे भेट देऊन तेथीही मदतीचा हात दिला अश्या विविध समाजोपयोगी उपक्रम राबवुन लाडक्या नेत्या ताईसाहेब यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अजिनाथ शेरकर यांनी केले आणि गीताराम गायकवाड यांनी आभार मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष खवतड,बारीक कडेकर रामनाथ मुळे सहदेव फड, संजय फड,जावळे दादा, गोरख फड, अमोल नेहरकर संकेत दराडे, सचिन दराडे वर्षा शेरकर, शशिकला दराडे, वंदना जाधव यांनी परीश्रम घेतले. शेवटी सामूहिक पसायदान घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# उठा मतदार राजांनो जागे व्हा-प्रा.आंधळे

## एस.आय.आर.ची मुदत वाढ ही शेवटची संधी

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रत्येक मतदाराने आपली एस. आय. आर. प्रक्रिया पूर्ण करावी माझ्या घरी येतील तेव्हाच फॉर्म भरेल असा विचार करू नका नाहीतर स्वतःला सरकारी कार्यालयात चकरा माराव्या लागू शकतात महाराष्ट्रातील सर्व मतदारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना भारत निवडणूक आयोगाने एस. आय. आर. प्रक्रियेची मुदतवाढ आता ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत दिलेली आहे अनेक नागरिकांना ही दिलासादायक बातमी वाटत असली तरी ही मुदतवाढ म्हणजे काम पुढे ढकलण्याची संधी नाही उलट ही प्रत्येक मतदारासाठी शेवटची जबाबदारी पार पाडण्याची संधी आहे आजही अनेक नागरिक असे म्हणताना दिसतात बी एल ओ हा फक्त तुमच्या घरासाठी नियुक्त केलेला अधिकारी नसतो त्याच्यावर संपूर्ण मतदान केंद्रातील शेकडो किंवा हजारो मतदारांची जबाबदारी असते त्यांना घर भेटी द्यायच्या असतात फॉर्म वाटायचे असतात भरलेले फॉर्म स्वीकारायचे असतात कागदपत्राची पडताळणी करायची असते माहिती ऑनलाईन अपलोड करायची असते आणि निवडणूक आयोगाने दिलेली अनेक कामे वेळेत पूर्ण करायची असतात त्यामुळे प्रत्येक मतदाराच्या घरी वेळेवर पोहोचणे नेहमी शक्य होईल अशी अपेक्षा ठेवणे वास्तववादी नाही म्हणून बीएलओ माझ्या घरी आले नाहीत म्हणून मी फॉर्म भरला नाही हे कारण पुढे तुमच्याच अडचणीचे ठरू शकते. तुम्ही स्वतः पुढाकार घ्या आपल्या बी एल ओ सी संपर्क साधा अधिकृत शिबिरात जा आवश्यक माहिती घ्या फॉर्म भरून प्रक्रिया पूर्ण करा कोणाला फॉर्म भरायचा माहित नसेल कोणती कागदपत्रे लागतील तुमच्या बाबतीत काय आवश्यक आहे हे विचारून खात्री करून घ्या शेवटच्या काही दिवसात काय होते हे आपण अनेक सरकारी कामांमध्ये पाहिले आहे मोठी गर्दी होते रांगा लागतात काही कागदपत्रे अपूर्ण राहतात पुन्हा दुरुस्ती करावी लागते एखादी माहिती चुकीची भरली तर परत कार्यालयात जावे लागते त्यामुळे शेवटच्या दिवसाची वाट पाहणे टाळा अनेक नागरिकांना अजूनही वाटते की माझे नाव आधीपासून मतदार यादीत आहे मग आता काही करायची गरज नाही अशा शंका असतील तर त्या मनात ठेवू नका थेट बीएलओ किंवा अधिकृत केंद्रात जाऊन विचारणा करा आपल्या नावाबाबत काय प्रक्रिया आवश्यक आहे याची खात्री करून घ्या आज एक गोष्ट लक्षात ठेवण्याची गरज आहे लोकशाही फक्त मतदानाच्या दिवशी मजबूत होत नाही तर मतदार म्हणून आपली नोंद योग्य ठेवण्यापासून ती सुरू होते म्हणून ही माहिती फक्त स्वतःपुरती ठेवू नका आपल्या कुटुंबीयांना शेजाऱ्यांना मित्रांना



नातेवाईकांना आणि विशेषता जेष्ठ नागरिकांना नक्की सांगा अनेकांना आजही या प्रक्रियेची पूर्ण माहिती नाही तुमच्या एका फोनमुळे एका संदेशामुळे किंवा एका शेअरमुळे एखाद्या व्यक्तीला योग्य वेळी माहिती मिळू शकते लक्षात ठेवा आजचा थोडासा वेळ उद्याचे मोठे हेलपाटे वाचवू शकतो. आजची जागरूकता उद्याचा मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवू शकते. ८ ऑगस्ट २०२६ ची अंतिम मुदत समजून आजच आवश्यक प्रक्रिया पूर्ण करा उद्या करू असे म्हणता म्हणता वेळ निघून जाऊ नये मतदान हा केवळ अधिकार नाही तर लोकशाही प्रति असलेली आपली जबाबदारी आहे त्या जबाबदारीची सुरुवात वेळेत प्रक्रिया पूर्ण करण्यापासूनच होते म्हणून सर्व मतदारांनी आपले गणना प्रपत्र बी एल ओ यांच्याकडे उद्याची वाट न बघता आजच भरून द्यावे असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# श्री दत्त संस्थान, बालाघाट येथे गुरुपौर्णिमा उत्सव सोहळ्याचे आयोजन

## कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे विविध धार्मिक कार्यक्रमांची भक्तिमय मेजवानी

**मांजरसुंबा । प्रतिनिधी**

**गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या पवित्र गुरुपौर्णिमेनिमित्त श्री दत्त संस्थान, बालाघाट, कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे बुधवार, दि. २९ जुलै २०२६ रोजी गुरुपौर्णिमा उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. प.पू. ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने व दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.**

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने श्री दत्त संस्थानमध्ये दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शिवाभिषेक, श्री दत्तमूर्ती अभिषेक, प.पू. महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, पादुका पूजन, महाआरती तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरु हे जीवनाला



योग्य दिशा देणारे मार्गदर्शक मानले जातात. त्यामुळे गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरुंचे पूजन करून त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होत असतात. श्री दत्त संस्थान, बालाघाट येथे होणाऱ्या या उत्सवामुळे परिसरात आध्यात्मिक व भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. या उत्सवासाठी अन्नदानाची सेवा पांडुरंग बाजीराव शिंदे (कपिलधारवाडी) व अश्रुबा माणिक शिंदे (कपिलधारवाडी) यांच्या वतीने करण्यात आली आहे.



पंचक्रोशीतील सर्व दत्त भक्तांनी या पवित्र गुरुपौर्णिमा उत्सवाला आवर्जून उपस्थित राहून श्री दत्त महाराजांचे दर्शन घ्यावे तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री दत्त संस्थान, बालाघाट व समस्त दत्त भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# आपेगावच्या जयकीसान विद्यालयात ४० वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा भावनिक स्नेहमिलन सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

**शाळेचे दिवस पुन्हा एकदा जगता आले तर... ही प्रत्येकाच्या मनातील भावना आपेगाव येथील जयकीसान विद्यालयात प्रत्यक्षात उतरली. तब्बल ४० वर्षांपूर्वी दहावीचे शिक्षण घेतलेल्या आणि आज ५० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमिलन सोहळा गुरुपौर्णिमेच्या पवित्र निमित्ताने अत्यंत नियोजनबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**

या संस्मरणीय कार्यक्रमाला सुमारे ६५ माजी विद्यार्थी उपस्थित होते. विशेष म्हणजे, त्या काळात विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षकही या सोहळ्यात सहभागी झाल्याने कार्यक्रमाला वेगळीच भावनिक उंची प्राप्त झाली.कार्यक्रमाची



सुरुवात साने गुरुजी लिखित खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने झाली. त्यानंतर संस्थेचे संस्थापक स्वर्गीय श्री. शेषेराव शिंदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रत्येक माजी विद्यार्थ्याने आपल्या शालेय जीवनातील आठवणी, आयुष्यातील प्रवास आणि गुरुजनांप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनीही चार दशकांपूर्वीच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. अनेकांच्या डोळ्यांत जुन्या आठवणींनी आनंदाश्रूही तरळले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयजीत शेषेराव शिंदे व सौ. वर्षा जयजीत शिंदे उपस्थित होते. तर श्री. नांदूरे, श्री. ढगे, श्री. काकडे, श्री. गोरे आणि श्री. साळुंके हे त्या काळचे शिक्षक व प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रमोद चरखा यांनी केले. डॉ. सतीश लड्डा आणि संजय देशमुख यांनी प्रास्ताविकातून स्नेहमिलनाचा उद्देश व या उपक्रमामागील भावना उपस्थितांसमोर मांडल्या. हा स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी प्रमोद चरखा, वसंत भोरे, संजय काळे, बलाप्रसाद बियाणी आणि धर्मराज शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. चार दशकांनंतर पुन्हा एकत्र आलेल्या मित्रांनी जुन्या आठवणींना उजाळा देत, गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत आणि भविष्यातही हा स्नेह कायम ठेवण्याचा संकल्प करत हा सोहळा संस्मरणीय ठरवला.

# पान १ वरून...

## कर्जमाफीच्या यादीत नाव

भरणे म्हणाले की, तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे काही चुका झाल्या असतील तर त्या निश्चितपणे दुरुस्त केल्या जातील. पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा संपूर्ण लाभ मिळेल, अशी त्यांनी खात्री दिली. कर्जमाफीच्या सर्व याद्या एकाच वेळी प्रसिद्ध होणार नसल्याचे स्पष्ट करत कृषिमंत्र्यांनी सांगितले की, जिल्हानिहाय आणि बँकनिहाय पडताळणी पूर्ण होत जाईल तसे नवीन लाभार्थी याद्या प्रसिद्ध करण्यात येतील. त्यामुळे शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत याद्यांची प्रतीक्षा करावी. दरम्यान, राज्यातील खरीप हंगामाचा आढावा देताना भरणे यांनी सांगितले की, आतापर्यंत झालेल्या पावसामुळे राज्यात ८४ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. येत्या आठ ते दहा दिवसांत समाधानकारक पाऊस झाल्यास शंभर टक्के पेरणी पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या माहितीनुसार, अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक पेरणी झाली असून ठाणे जिल्ह्यात सर्वात कमी पेरणी झाली आहे. मराठवाड्यात अद्यापही पावसाचे प्रमाण कमी असल्याने तेथील पेरणीवर परिणाम झाल्याचे त्यांनी नमूद केले.

--------------

## सर्वसामान्यांना फटका ; साखर महागली !

अपुऱ्या पावसाचा उसाच्या वाढीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे आगामी गळीत हंगामात साखर उत्पादनात आणखी २० ते २५ टक्क्यांची घट होण्याची शक्यता साखर उद्योग क्षेत्रातून व्यक्त करण्यात येत आहे. दुसरीकडे श्रावण, गणेशोत्सव, नवरात्र, दसरा आणि दिवाळी या सणांमुळे पुढील काही महिन्यांत साखरेची मागणी वाढणार असल्याने दर आणखी वाढू शकतात, असा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. घाऊक व्यापाऱ्यांच्या मते, साखर उत्पादनातील घट, कमी विक्री कोटा आणि पुढील हंगामाबाबतची अनिश्चितता यामुळे कारखान्यांकडूनच साखर महाग मिळत आहे. त्यामुळे व्यापारी आणि मोठे ग्राहक आगाऊ खरेदी करत असून बाजारातील तेजी कायम आहे.'' किरकोळ व्यापारी म्हणतात की, घाऊक दरवाढीचा थेट परिणाम किरकोळ विक्रीवर झाला आहे. वाढीव दराने साखर खरेदी करावी लागत असल्याने किरकोळ भाव वाढविणे अपरिहार्य ठरले आहे. साखर कारखान्याच्या म्हणण्यानुसार जूनअखेर कारखान्यांना साखर तोट्यात विकावी लागत होती. आता दरात सुधारणा झाली असली तरी उत्पादन खर्च भागविण्यासाठी साखरेचा दर किमान ४,३०० रुपये प्रति क्विंटल असणे आवश्यक आहे.

---------------

## केंद्राने आश्वासनानुसार एफआयआर

उतरून आंदोलन छेडेल, असा इशारा त्यांनी पुन्हा एकदा दिला. ''सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा आमच्या मागण्यांव्यतिरिक्त असावा. आधी आमच्या मूळ मागण्या पूर्ण झाल्याच पाहिजेत, त्यानंतर सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करावे किंवा दिलासा द्यावा,'' अशी भूमिका दास यांनी मांडली. दरम्यान, २० जुलै रोजी दिल्लीत सीजेपीच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान आंदोलक आणि दिल्ली पोलीस तसेच 'आरएएफ'च्या जवानांमध्ये जोरदार चकमक झाली होती. संसदेच्या दिशेने कूच करणाऱ्या आंदोलकांना पांगवण्यासाठी सुरक्षा दलांनी लाठीमार, अश्रूधूर आणि पेलेट गन्सचा वापर केल्याचा आरोप आहे.

------------

## जिथे लाज वाटायला हवी होती,

या निर्णयाद्वारे देशातील करोडो मुलींना सरकार कोणता संदेश देऊ इच्छिते?'', असा टोलाही त्यांनी लगावला. नीट ची परीक्षा देणारे बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत. मुलांच्या शिक्षणासाठी त्यांची आई दागिने विकत आहे, तर वडील जमीन गहाण ठेवत आहेत. मात्र, सरकारच्या नाकर्तेपणामुळे ही मुले आज नैराश्याच्या गर्तेत ढकलली गेली आहेत. या देशात कष्टापेक्षा पैशालाच जास्त महत्त्व आहे, असाच संदेश प्रामाणिक विद्यार्थ्यांना दिला जात आहे,'' अशी उद्विग्नता प्रियंका गांधी यांनी यावेळी व्यक्त केली. शिक्षणाचा आणि अभिव्यक्तीचा अधिकार भारतीय संविधानाने प्रत्येकाला दिला असल्याचे सांगत प्रियंका गांधी म्हणाल्या, ''आजपर्यंत विविध परीक्षांमध्ये झालेल्या घोटाळ्यांमुळे शेकडो विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपवले आहे. मात्र, याला जबाबदार असणाऱ्या दोषींवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. आज आपल्या संपूर्ण शिक्षण व्यवस्थेत आरएसएसने () घुसखोरी केली असून सरकारने शिक्षणावरील खर्चातही मोठी कपात केली आहे.'' यावेळी प्रियंका गांधी यांनी पोलिसांच्या लाठीहल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या दिल्लीतील एका विद्यार्थिनीचा आणि तिच्या आईचा थरारक अन्? हृदयद्रावक अनुभव सभागृहात मांडला. त्या म्हणाल्या, ''काही दिवसांपूर्वी पोलीस लाठीहल्ल्यात गंभीर जखमी होऊन 'आयसीयू'मध्ये जीवनाशी झुंज देणाऱ्या दिल्लीतील एका विद्यार्थिनीच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी आम्ही राम मनोहर लोहिया () रुग्णालयात गेलो होतो. आमच्या पोहोचण्याच्या काही वेळ आधीच केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा तिथे जाऊन आले होते, तर त्यांच्या आधीही एक नेते भेट देऊन गेले होते. सतत येणाऱ्या राजकीय नेत्यांच्या या फेऱ्यांमुळे त्या मुलीची आई व्यथित झाली होती.'' आम्ही जेव्हा आयसीयूच्या दाराशी पोहोचलो, तेव्हा त्या मुलीच्या आईने आम्हाला विचारले, 'तुम्ही इथे कशाला आला आहात?' हात जोडून आणि थरथरत्या हातांनी त्या म्हणाल्या, 'तुम्ही आलात त्याबद्दल आभार, पण मला आता कोणालाही भेटायचे नाही आणि कोणाशीही बोलायचे नाही.' त्या आईचे दुःख इतके मोठे होते की त्यांचे संपूर्ण शरीर थरथरत होते. अतिशय वेदनादायी आवाजात त्या म्हणाल्या, 'सकाळपासून मोठे मोठे नेते एकापाठोपाठ एक इथे येत आहेत आणि व्हिडिओ बनवत आहेत. अहो, माझ्या मुलीची ही अवस्था ज्यांच्यामुळे झाली आहे, ते लोकही इथे येऊन गेले... का करताय हे सर्व?''', असा सवालही त्या आईने केल्याचे प्रियंका गांधी यांनी सांगितले.

----------------

## अतिरिक्त शिक्षकांचे रिक्तपदी समायोज

गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. येत्या दोन दिवसात माध्यमिक शिक्षकांचे रिक्तपदी समायोजन केले जाणार असल्याची, माहितीही मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिली.

----------------

## रिजर्व्ह बँकेकडे ८८०.५२

होता. या प्रश्नाचं उत्तर सरकारकडून राज्यसभेत देण्यात आलं आहे. कमजोर जागतिक संकेत आणि रुपया मजबूत झाल्यानं नवी दिल्लीतील सर्राफा बाजारात मंगळवारी सोन्याच्या दरात २६४० रुपयांची घसरण झाली, यामुळं एक तोळे सोन्याचा दर १.४७ लाख प्रति तोळा झाला. दुसरीकडे चांदीच्या दरात ५२०० रुपयांची घसरण झाली आहे. अखिल भारतीय सर्राफा संघानुसार २४ कॅरेट सोन्याचा दर सोमवारी १,४९,६४० रुपये प्रति १० ग्रॅम होता. त्या तुलनेत आज २,६४० रुपयांनी सोन्याचे दर कमी होऊन १,४७,००० रुपयांवर आले. चांदीच्या दरात देखील घसरण पाहायला मिळाली, आज चांदीचे दर ५,२०० रुपयांनी कमी होत २,२४,८०० रुपये किलोवर आला. सर्राफा व्यावसायिकांनी रुपया मजबूत झाल्यानं देशांतर्गत बाजारात सोने चांदी आयात करण्याचा खर्च कमी झाल्याचं म्हटलं. दुसीरकडे अमेरिकन फेड रिझर्व्हकडून पतधोरण जाहीर करण्यापूर्वी गुंतवणूकदारांकडून सतर्कता बाळगण्यात आली.एचडीएफसी सिक्यूरिटीजचे रिसर्च विश्लेषक सौमिल गांधी यांनी म्हटलं की सोन्याच्या दरात मंगळवारी घसरण झाली आहे. अमेरिकन फेड रिझर्व्हकडून पतधोरण जाहीर करण्यापूर्वी गुंतवणूकदार सतर्क झाले आहेत. दरम्यान, इंडिया बुलियन्स ज्वेलर्स असोसिएशनकडून दिवसातून दोन वेळा सोने आणि चांदीचे दर जाहीर केले जातात. आयबीजेएच्या दरांनुसार २४ कॅरेट सोन्याचा दर १४२२९१ रुपये १० ग्रॅम आहे. तर, २२ कॅरेट सोन्याचा दर १३०३३९ रुपये प्रति तोळा झाला आहे. दुसरीडे चांदीच्या दरात देखील मोठी घसरण झाली. एक किलो चांदीचा दर २१७३४९ रुपयांवर पोहोचला आहे.

--------------

## पर्यावरण संवर्धन हीच पंकजाताईंना खरी

संख्येने उपस्थित होते. चौसाळा येथील नवगण शिक्षण संस्था संचलित कला, विज्ञान महाविद्यालयाच्या सुमारे ०.५० हेक्टर परिसरात डॉ.क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून १५ हजार वृक्षांची लागवड करून घनदाट जंगल प्रकल्प साकारण्यात आला आहे. यावेळी माजी सभापती काकासाहेब जोगदंड, गणेश काकडे, इम्रान जागीरदार, लहू नाईकवाडे, प्राचार्य पंडित खाकरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यानंतर चौसाळा येथील कै.चांदमल लोढा विद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रमातही डॉ.क्षीरसागर सहभागी झाले. यावेळी तानाजी थोरात, भीमराव विधाते, चंद्रकांत मुळे, राहुल जोगदंड, गणेश काकडे, विनोद कळासे, अंकुश कळासे, भागवतराव आंधळे, अंकुश गोरे, आप्पा झोडगे आदी उपस्थित होते. त्यानंतर शिवणी येथील धम्मभूमी महाविहार परिसरातही वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी भाऊनाना सुरवसे, भगीरथ बांडे, उद्धव म्हेत्रे, अशोक वैद्य, नामदेव म्हेत्रे, महादेव नागरगोजे, आयोजक शाम राऊत, बाळासाहेब डोळस यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. याच उपक्रमाचा भाग म्हणून परिसरातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचेही वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि शैक्षणिक प्रोत्साहन अशा सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून ना. पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

--------------

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. २९ जुलै २०२६



## थोडक्यात

### नवविकास मंडळाच्या अध्यक्षपदी माजी आ.डी.के.देशमुख यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

मागील सहा दशकांपासून मराठवाड्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणून कार्यरत असणाऱ्या नवविकास मंडळ माजलगाव या शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी मराठवाड्याचे माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांची तर कार्यवाह पदी संपादक शिरीष देशमुख यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



आदर्श वाचनालयात झालेल्या मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्ष-मा.आ.डी.के.देशमुख, उपाध्यक्ष-प्रा.पी.के.देशमुख, कार्यवाह-संपादक शिरीष देशमुख, सहकार्यवाह-संपादक सुहास देशमुख, संचालक पदी नगरसेवक डॉ.सचिन देशमुख,श्री.राहुल मुळी, श्री.गणेश मुळाटे या सर्व पदाधिकाऱ्यांची सर्व संस्था सदस्यांनी बिनविरोध निवड केली.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते यांनी कामकाज पाहिले. या निवडीनंतर संस्थेचे माजी अध्यक्ष विधिज्ञ एस.आर.शर्मा, माजी सहकार्यवाह आर.बी.देशमुख, संस्था सदस्य विधिज्ञ एस.बी.मुळी, विधिज्ञ सुलभाताई देशमुख, शोभाबाई मसलेकर यांसह उपस्थित सर्व सदस्यांनी नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.



### नागराज बांधकाम पर्यवेक्षक हस्तकला अध्यापक महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल

माजलगाव । प्रतिनिधी

नागराज बांधकाम पर्यवेक्षक हस्तकला अध्यापक महाविद्यालय, तेलगाव (ता धारूर) यांनी यंदाच्या बांधकाम पर्यवेक्षक, हस्तकला व कार्यानुभव शिक्षक प्रमाणपत्र (उढउ) परीक्षेत शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयातील प्रवेशित ६० पैकी ६० विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले असून, या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यंदाच्या परीक्षेत प्रतीक विष्णू उगले यांनी ७०० पैकी ६१९ गुण घेत ८८ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला असून त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या अथक परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश संपादन झाले आहे. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाचे नाव संपूर्ण जिल्ह्यात अभिमानाने उजळले आहे. विशेष म्हणजे, यंदाचे वर्ष महाविद्यालयासाठी अधिक आनंदाचे ठरले असून महाविद्यालयाने यशस्वी शैक्षणिक वाटचालीची १६ वर्षे पूर्ण केली आहेत. या सोळा वर्षांच्या कालावधीत संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्कृष्ट निकाल आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यामध्ये महाविद्यालयाने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. महाविद्यालयाचे प्रमुख हरी गिरी यांनी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकवृंद, पालक आणि संस्थेच्या सर्व सहकाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. महाविद्यालयाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत ची प्रतीक हा माजलगाव येथील पत्रकार विष्णू (दादा) उगले यांचा मुलगा आहे. भविष्यातही अशीच उज्ज्वल यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास प्राचार्य गिरी सर यांनी व्यक्त केला जात आहे.

# जल जीवन मिशन कार्यक्रम भौतिक प्रगती कमी पुनर्जोडणी योजनांना जिल्हाधिकाऱ्यांची तात्पुरती स्थगिती

बीड । प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला प्रतिमाणशी ५५ लिटर शुद्ध पाणी देण्याचे उद्दिष्ट आहे. मात्र, जिल्ह्यात ज्या नवीन पाणी पुरवठा योजनांची भौतिक प्रगती २५ टक्केपेक्षा कमी आहे आणि ज्या पुनर्जोडणी योजनांची प्रगती ५० टक्केपेक्षा कमी आहे, अशा योजनांना तात्पुरती स्थगिती देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहे

जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी प्रमुख उपस्थित होते.



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, एक गाव योजना व अनेक गाव योजना यापैकी ज्यांची भौतिक प्रगती २५ टक्के किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा योजनांची कामे राज्यस्तरीय फेरआढाव्यासाठी तात्पुरती स्थगित ठेवली जातील. हा फेरआढावा पूर्ण झाल्यानंतर केवळ अत्यंत आवश्यक असलेल्या योजनांनाच पुढील कामकाजासाठी परवानगी दिली जाईल.

सोमवार दि.२७ जुलै २०२६ रोजीच्या भौतिक प्रगतीप्रमाणे २५ टक्क्याच्या खालील योजनेचे कंत्राटदारामुळे प्रलंबित योजनांची संख्या २० असून उप अभियंत्याच्या अहवालानूसार चालू ठेवावयाच्या योजनांची संख्या ३ अशी आहे तर भौतिक प्रगतीप्रमाणे ५० टक्क्याच्या खालील योजनेचे कंत्राटदारामुळे प्रलंबित योजनांची संख्या ७७ असून उप अभियंत्याच्या अहवालानूसार चालू ठेवावयाच्या योजनांची संख्या ५३ अशी आहे. अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## मराठवाडा चेंबर्सच्या २९ व्या अधिवेशनात बीड येथील सुदाम चव्हाण यांचा पुरस्काराने सन्मान

बीड । प्रतिनिधी

व्यापार-उद्योग, वृत्तपत्र वितरण आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यासह संघर्षमय वाटचालीची दखल घेत बीड येथील सुदाम चव्हाण यांचा मराठवाडा चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या २९ व्या अधिवेशनानिमित्त नांदेड-धर्माबाद येथे आयोजित व्यापारी परिषदेत पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. बीड जिल्हा व्यापारी संघटना आणि मराठवाडा विभागीय समितीच्या वतीने त्यांच्या कार्याची नोंद घेत पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

नांदेड-धर्माबाद येथे झालेल्या कार्यक्रमात मराठवाडा चेंबर्सचे अध्यक्ष आदेश पाल सिंगजी छाबडा, माजी अध्यक्ष मानसींग पवार, उपाध्यक्ष सुनिल किर्दत, नांदेड जिल्हा व्यापारी अध्यक्ष सुबोध ओमप्रकाश काकांनी आणि विधी तज्ञ सुप्रीम कोर्ट राहुल हिंगमीरे यांच्या हस्ते सुदाम चव्हाण यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बीड जिल्हा व्यापारी संघाचे अध्यक्ष भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष अशोक अप्पा शेटे, शहर अध्यक्ष प्रकाश कानगांवकर,



सचिव तुकाराम साळुंके आणि मराठवाडा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष सत्यनारायन लाहोटी, मोहम्मद लाईक उपस्थिती होती.

शेतमजुराच्या कुटुंबात जन्मलेल्या सुदाम चव्हाण यांना लहान वयातच संघर्षाला सामोरे जावे लागले. वडिलांचे छत्र हरपल्यानंतर आई आणि बहिणीची जबाबदारी सांभाळत त्यांनी हमाली, आठवडी बाजारातील कष्ट आणि वस्तूंची विक्री करून शिक्षणाचा खर्च भागवला. १९८६ ते १९८९ या काळात बंकटस्वामी महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. पुढे अर्थशास्त्र विषयात एम.ए. करण्यासाठी मराठवाडा विद्यापीठात प्रवेश घेतला. रात्री दैनिकाच्या पार्सल विभागात काम आणि दिवसा शिक्षण व स्पर्धा परीक्षेचा अभ्यास असा त्यांचा दिनक्रम होता.

१९८९ मध्ये बीडला परतल्यानंतर संतोष बुक स्टॉलमध्ये वृत्तपत्र वितरणाचे काम सुरू केले. ३ डिसेंबर १९९५ रोजी सुभाष रोडवरील नगरपरिषदेच्या गाळ्यातून लक्ष्मी न्यूजपेपर एजन्सीच्या कामाला सुरुवात केली. या प्रवासात दोन मुली आणि एक मुलगा - कल्याणी, किरण आणि प्रथमेश - हे तिन्ही अपत्ये एमबीबीएस डॉक्टर झाली असून कल्याणी पुढील सुपरस्पेशालिटीचे शिक्षण घेत आहे.

वृत्तपत्र वितरण क्षेत्रातील ग्रामीण तरुणांना त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रयत्नांतून २०० हून अधिक तरुण अधिकारी, प्राध्यापक आणि विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. लक्ष्मी गोविंद बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून प्रेस कामगारांचा सन्मान, रेनकोट वाटप आणि आरोग्य विमा उपक्रम राबवण्यात आले. आदर्श मार्केट व्यापारी असोसिएशनच्या माध्यमातून ८० हून अधिक दुकानदारांसाठी स्वच्छता उपक्रम राबवण्यात आला. संत मुक्ताबाई पालखी आणि रामनवमीच्या सेवाकार्यातही त्यांनी सहभाग घेतला.बीड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे मागील १५ वर्षांपासून अध्यक्ष असलेल्या सुदाम चव्हाण यांना राज्यस्तरीय दर्पण पुरस्कार तसेच व्हॉइस ऑफ मीडिया पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. वयाच्या ६२ व्या वर्षीही ते पहाटे साडेचार वाजता बसस्थानकावर पोहोचून वृत्तपत्र वाचकांपर्यंत पोहोचवतात. व्यापारी परिषदेत व्यापार-उद्योग क्षेत्रासमोरील प्रश्न, अडचणी आणि भविष्यातील वाटचालीवर चर्चा झाली. विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधींनी विकासासाठी आवश्यक उपाययोजना, संघटनात्मक भूमिका आणि परस्पर समन्वयाबाबत विचार मांडले. या पार्श्वभूमीवर सुदाम चव्हाण यांच्या कार्याचा झालेला सन्मान हा बीडच्या व्यापार, उद्योग आणि वृत्तपत्र क्षेत्रासाठी गौरवाचा ठरला.

## बुद्धघोष यास धम्मकार्यासाठी भदंत डॉ. सुमेधबोधी (ए) यांच्याकडे दत्तक; बीडमध्ये प्रेरणादायी सोहळा

बीड । प्रतिनिधी

तथागत गौतम बुद्ध यांच्या समता, करुणा आणि प्रज्ञेच्या धम्माचा प्रसार अधिक व्यापक व गतिमान




करण्याच्या उद्देशाने पाटोदा येथील जावळे कुटुंबीयांनी आपल्या बुद्धघोष या मुलास धम्मकार्यासाठी भदंत डॉ. सुमेधबोधी (ए) यांच्या स्वाधीन करण्याचा प्रेरणादायी निर्णय घेतला. हा दत्तक सोहळा मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी भारतीय बौद्ध महासभेच्या बीड येथील मध्यवर्ती कार्यालयात संपन्न झाला.

भदंत डॉ. सुमेधबोधी (ए) हे वर्षावासानिमित्त बीड येथील त्रिरत्न बुद्ध विहार येथे वास्तव्यास असून, धम्मप्रसारासाठीचा धम्मरथ देखील त्यांच्या सोबत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मकार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी जावळे कुटुंबीयांनी हा निर्णय घेतल्याने उपस्थितांनी त्याचे स्वागत केले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे बीड तालुकाध्यक्ष राजेंद्र ससाने बीड तालुका कोषाध्यक्ष गोपीनाथ बनसोडे, सुनील जावळे तसेच बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी बुद्धघोष याला शुभेच्छा देत त्याच्या उज्ज्वल धम्मप्रवासासाठी मंगलकामना व्यक्त केल्या. या प्रसंगी भदंत डॉ. सुमेधबोधी (ए) यांनी धम्माचा प्रसार, सामाजिक परिवर्तन आणि मानवकल्याणासाठी तरुण पिढीने पुढे येण्याचे आवाहन केले. हा सोहळा धम्मनिष्ठा, समर्पण आणि समाजप्रबोधनाचा प्रेरणादायी संदेश देणारा ठरला.

## भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा अंबाजोगाईचा उपक्रम ; शालेय सैनिकांना शैक्षणिक साहित्य वाटप



अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा अंबाजोगाईचे शहराध्यक्ष सुधाकर हातागळे यांच्या हस्ते क्रांती नगर, अंबाजोगाई येथे रविवार, दि. २६ जुलै रोजी ध्वजारोहण करण्यात आले. धम्म ध्वजारोहण झाल्यानंतर समता सैनिक दलातील ५० शालेय सैनिकांना शैक्षणिक साहित्य ज्यामध्ये विविध प्रकारच्या वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल व फळांचे वाटप करण्यात आले.

या कौतुकास्पद उपक्रमासोबतच हर्षवर्धन बाळासाहेब खांडके या युवा भीमसैनिकाच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या वतीनेही उपरोक्त सैनिकांना वह्या व फळांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखा, अंबाजोगाईचे शहराध्यक्ष सुधाकर हातागळे, बाळासाहेब खांडके, भारत दासुद, दिलीप वैद्य, अर्जुन वाघमारे, अविनाश घनगाव, अशोक गडसिंग, शिवाजी सोनवणे, भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखेचे, तालुका शाखेचे व शहर शाखेचे समता सैनिक बहुसंख्येने उपस्थित होते. त्यामध्ये राम कासारे अण्णा, निवृत्ती अण्णा कांबळे, पंकज भटकर, रखमाजी जोगदंड, परतवाघ सर, सतीश मस्के, राजेभाऊ घाटे, उद्धव गायकवाड हे उपस्थित होते. यापूर्वीही भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा अंबाजोगाई यांच्या वतीने अपेक्षा अंगद सोनवणे या होतकरू विद्यार्थिनीस वसतीगृह प्रवेशासाठी व शैक्षणिक मदतीसाठी धावून गेल्याने भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखा, अंबाजोगाईचे शहरातून कौतुक होत आहे, आणि अंबाजोगाईतील नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## पान ६ वरुन...

### धारूर शहर हे येणाऱ्या काळात

समस्या मार्गी लागून दर दिवसाला पाणी कसे देता येईल यासाठी नगरपरिषद प्रयत्नशील राहील तसेच १०२ कोटी रुपयाच्या निधीतून शहरातील रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. धारूर पोलीस स्टेशन, नागरी रुग्णालय व घाटाचा प्रश्न सोडवण्यासाठी मी प्रयत्नशील आहे धारुर नगरपरिषदेने जनसेवेसाठी कायम जागरूक राहून नागरिकांना कसलीच अडचण येणार नाही यासाठी प्रयत्नशील राहिली पाहिजे येणाऱ्या काळात धारुर शहराच्या विकास कामासाठी मोठ्या प्रमाणावर विकास निधी उपलब्ध होऊन धारूर शहराचा कायापालट होणार आहे. त्यामुळे धारूर शहर मराठवाड्यातील एक आदर्श गाव म्हणून पुढे येणार असे मोठे वक्तव्य धारूर शहराच्या विकासावर बोलताना आ. प्रकाश सोळंके यांनी पुढे बोलताना केले. या कार्यक्रमात रमाई घरकुल योजना , पंतप्रधान आवास योजना व बचत गटाच्या सदस्यांना धनादेशाचे वितरण करण्यात आले तसेच निबंध स्पर्धा ,चित्रकला स्पर्धा व गणेश मंडळांना बक्षीस वितरण आयुष्यमान भारत कार्डचे आ. सोळंके यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड. परमेश्वर शिनगारे यांनी तर प्रस्ताविक शहराध्यक्ष डॉ. मयूर सावंत यांनी केले कार्यक्रमाचे आभार उपाध्यक्ष प्रतिनिधी सय्यद शाकेर यांनी मानले जनसेवा सप्ताह यशस्वी पार पाडण्यासाठी चोकाराम गायसमुद्रे,मदन धोत्रे,गौतम चव्हाण, ज्ञानेश्वर शिंदे,सुरज कोमटवार, विकी चव्हाण, मिथुन गायसमुद्रे, सुनील कावळे, संजय तीबोले,सैय्यद रज्जाक, ऋषिकेश जाधव ,रुपेश जाधव व नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक महोत्सवाचे

व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, वाहतूक व्यवस्था तसेच इतर आवश्यक पायाभूत सुविधांची सविस्तर पाहणी केली. त्यानंतर आयोजन समितीसोबत बैठक घेऊन विविध विभागांच्या तयारीचा आढावा घेत आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले.

या प्रसंगी प्रा.प्रदीप रोडे यांनी महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या वतीने सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही दिली. प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे यांनी महोत्सवासाठी महाविद्यालयात सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून, स्पर्धक व मान्यवरांच्या स्वागतासाठी सर्व तयारी पूर्ण करण्यात येत असल्याची माहिती दिली. या दोन दिवशीय प्रादेशिक युवा महोत्सवात मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि नाशिक विभागातील एसएनडीटी महिला विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील शेकडो विद्यार्थिनी-कलाकार सहभागी होणार आहेत. यात संगीत, नृत्य, नाट्य, ललित कला आणि वाङ्मयीन स्पर्धांचा समावेश असेल. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे, सांस्कृतिक समन्वयक, प्राध्यापक व कर्मचारी वर्ग अथक परिश्रम घेत आहेत. महोत्सवाच्या तयारीला आता वेग आला असून, बीड नगरीत या सांस्कृतिक सोहळ्याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

### ट्विंकलिंग स्टार इंग्लिश

यांच्यासह शिक्षिका स्वाती महाकुंडे, आशा धापसे, स्नेहल माने, मनीषा डापकर आणि दीपिका कदम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुचिता देवगुडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दीपिका कदम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करून भक्तिमय वातावरणात सोहळ्याची सांगता करण्यात आली.

संतांच्या रूपातील बालगोपाळांनी वेधले लक्ष

या बाल दिंडीचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेली भगवान विठ्ठल, माता रुक्मिणी आणि वारकरी संतांची वेशभूषा होय. नरेंद्र काचगुंडे याने भगवान विठ्ठल, श्लोका लकडे हिने माता रुक्मिणी, अद्विक येडशीकर याने संत तुकाराम, तर सई कोटुळे हिने संत मुक्ताबाई यांची भूमिका अत्यंत सुंदरपणे साकारून उपस्थितांची मने जिंकली. संतांच्या वेशातील या बालगोपाळांनी दिंडीला भक्तीमय आणि संस्कारमय स्वरूप प्राप्त करून दिले.

### संतोष सानप यांना ‘ समाजरत्न’

मर्यादित न ठेवता, त्याद्वारे गोरगरिबांना न्याय मिळवून देणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे हीच त्यांची खरी ओळख राहिली आहे. त्यांच्या याच दीर्घकालीन आणि तळमळीच्या सामाजिक-पत्रकारिक योगदानाची दखल घेऊन त्यांना या पुरस्कारासाठी निवडण्यात आले आहे. हा पुरस्कार सोहळा रविवार, दिनांक ९ ऑगस्ट २०२६ रोजी नाशिक येथे भव्य दिव्य वातावरणात संपन्न होणार आहे. राज्यभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या शुभहस्ते आणि समाजबांधवांच्या उपस्थितीत संतोष सानप यांना हा ’समाजरत्न पुरस्कार’ प्रदान करून गौरविले जाणार आहे.

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-९८० दिनांक २७/०७/२०२६

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **लहु प्रल्हाद पाळेकर रा.सोनक पिंपळगाव ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या मुलाच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म/मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | अभिजित लहु पाळेकर | मुलगा | ०५/०५/२०११ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२७/०७ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-३५१ दिनांक ०४/०६/२०२६

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **भगवान गंगाधर जवळकर रा.देवहिवरा ता. घनसावंगी जि. जालना** यांनी यांच्या नातीच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म/मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | स्वरा लक्ष्मण जवळकर | नाती | ०५/०६/२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०४/०६ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-८१७ दिनांक २२/०७/२०२६

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **नफीस युनूस शेख, रा. अंबड ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या मुलाच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म/मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | अरबाझ नफीस शेख | मुलगा | १८/०१/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-/ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**टी.सी.हरवला आहे**

शितल जगन्नाथ मुळे यांची मत्स्योदरी विद्यालय अंबड इयत्ता ७ वी पासची टीसी अंबड-जालना प्रवास करीत असताना हरवली आहे. कोणाला सापडल्यास संपर्क साधावा.

**संपर्क : ९६५९५२८४४३**

# घागरवाडा येथे ११ हजार वृक्षांची लागवड!

## इको बटालियनच्या जवानांच्या पर्यावरणसेवेला सलाम



धारूर : देशाच्या सीमांचे रक्षण करणारे भारतीय जवान हे केवळ मातृभूमीचे संरक्षणच करत नाहीत, तर निसर्गसंवर्धनाची जबाबदारीही ते तितक्याच निष्ठेने पार पाडत आहेत. धारूर तालुक्यातील घागरवाडा येथील बालाघाटाच्या खडकाळ डोंगररांगांना हिरवाईची शाल चढविण्याचे प्रेरणादायी कार्य इको बटालियन मागील तीन वर्षांपासून सातत्याने करत आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळे ओसाड डोंगर आज नंदनवनात रूपांतरित होत असून, ही पर्यावरणासाठीची देशसेवाच असल्याचे गौरवोद्गार जलनायक मयंक गांधी यांनी काढले. सोमवार, दि. २७ रोजी घागरवाडा येथील डोंगर परिसरात अवघ्या काही तासांत तब्बल ११ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. या प्रेरणादायी उपक्रमास जलनायक मयंक गांधी यांनी उपस्थित राहून जवानांच्या कार्याचे कौतुक केले. त्यांनी स्वतःही वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

यावेळी बोलताना मयंक गांधी म्हणाले, ‘‘देशाच्या सीमांचे रक्षण करणारे जवान आज निसर्गाच्या सीमाही मजबूत करत आहेत. प्रत्येक लावलेले झाड म्हणजे भावी पिढ्यांसाठी सुरक्षित, समृद्ध आणि हरित भारताची अमूल्य ठेव आहे. इको बटालियनचे कार्य प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे.’’ ग्लोबल विकास ट्रस्टने यावर्षी २५ लक्ष वृक्ष लागवड व संवर्धनाचा महासंकल्प हाती घेतला आहे. या अभियानाला जनतेचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, प्रारंभीच्या चार दिवसांतच ३५ लाखांहून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

या अभियानाअंतर्गत इको बटालियनला मोठ्या प्रमाणावर रोपे उपलब्ध करून देण्यात आली असून, त्यांच्या माध्यमातून ही झाडे केवळ लावलीच जाणार नाहीत, तर त्यांचे संगोपन करून त्यांना जगविण्याची जबाबदारीही तितक्याच समर्पणाने पार पाडली जाणार आहे.

सीमेवर शत्रूशी लढणारे हेच जवान आज पर्यावरणाच्या लढाईतही आघाडीवर आहेत. त्यांच्या हातून उभे राहणारे प्रत्येक हिरवे रोप भविष्यातील पिढ्यांसाठी जीवनाचा श्वास ठरणार असून, घागरवाड्यातील हा उपक्रम देशसेवा आणि पर्यावरणसेवा यांचा प्रेरणादायी संगम ठरला आहे.

## शेतीमध्ये वर्मीवॉश वापरण्याचे फायदे



वर्मीवॉश हे एक प्रकारचे द्रव स्वरूपातील सेंद्रिय खत आहे. हे द्रव गांडूळ आणि शेणखत यांच्या पासून बनवले जाते. गांडूळ खत भिजवल्यानंतर मिळणारे द्रव हे वनस्पतीसाठी पोषक असते, तसेच सूक्ष्मजीव आणि ह्युमिक पदार्थांनी समृद्ध असते, त्यामुळे ते एक प्रभावी खत आहे.

वर्मीवॉश तयार करण्याची पद्धत : आपण २५० लिटर क्षमतेच्या कॉंक्रीट किंवा प्लास्टिक बॅरलपासून बनवलेल्या मोठ्या कंटेनरमध्ये वर्मीवॉश युनिट तयार करू शकतो. निवडलेल्या कंटेनरच्या तळाशी एक छिद्र पाडून घ्यावे. नंतर बॅरलच्या तळाशी १० ते १५ सेमी किंवा कंटेनरच्या १० ते १५% उंचीपर्यंत रेती किंवा विटांचे तुकडे भरावे. कंटेनरमध्ये १० ते १५ सेंटीमीटर किंवा १०-१५% उंचीपर्यंत खडबडीत वाळूसह आणखी एक थर जोडावा. नंतर वाळूच्या या थरावर गवत ठेवावे. मग यामध्ये चांगला कुजलेला सेंद्रिय कचरा किंवा शेण (१० दिवस जुने) टाकावे व ते नंतर ओले करून घ्यावे. वर्मीवॉश कंटेनरमध्ये सुमारे १००० ते १५०० किशोर किंवा प्रौढ गांडुळे सोडा आणि वर्मीवॉश युनिटमध्ये नियमित ओलावा ठेवावा. वर्मीवॉश मिळविण्यासाठी, त्याच्या मध्यभागी एक छिद्र असलेल्या लहान बादलीतून सतत पाणी काढून घ्यावे. छिद्रांमध्ये कापुस किंवा बांबूच्या काड्या ठेवा जेणेकरून पाणी खाली येईल. फिल्टर युनिटद्वारे पोषक तत्वे वाहून नेणाऱ्या कंपोस्ट द्वारे पाणी हळूहळू तळाशी झिरपते. कंटेनर दररोज ४ ते ५ लिटर पाण्याने भरा. ७ ते १० दिवसानंतर, व्हर्मीवॉश कंटेनरमध्ये तयार होते. १५ दिवसांत सुमारे ३५ ते ४० लिटर व्हर्मीवॉश तयार होऊ शकते. गोळा केलेले वर्मीवॉश थंड आणि कोरड्या जागी साठवले पाहिजे. आता तयार झालेले वर्मीवॉश तुम्ही पिकावर फवारणी किंवा आळवणीसाठी वापरू शकता. वर्मीवॉश वापरण्याचे फायदे : वर्मीवॉश हे १००% सेंद्रिय आणि पर्यावरणास अनुकूल आहे. त्यामुळे सेंद्रिय शेतीमध्ये हे मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. याच्यामुळे मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता सुधारते व मुख्य आणि सूक्ष्म पोषक घटकांची पातळी देखील सुधारते. हे पिकाच्या आणि त्यांच्या निरोगी मुळांच्या वाढीस अतिशय उत्तम आहे. वर्मीवॉश हे सेंद्रिय एक कीटकनाशक म्हणून देखील वापरले जाऊ शकते. याचा जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकवून ठेवण्यामध्ये देखील खूप मोठा वाटा आहे. वर्मीवॉशमुळे काही घातक बुरशी देखील कंट्रोल होतात.

वर्मीवॉश वापराचे प्रमाण : याचा वापर आपण फवारणी किंवा आळवणी अशा दोन्ही पद्धतीने करू शकतो. फवारणीसाठी १ लीटर वर्मीवॉश १० लीटर पाण्यात मिसळून वापरावे. आळवणीसाठी २० लीटर वर्मीवॉश २०० लीटर पाण्यात मिसळून एक एकर साठी ड्रिप किंवा आळवणी द्वारे वापरावे.

वर्मीवॉश वापरताना कोणती काळजी घ्यावी : हे १००% सेंद्रिय असल्यामुळे यामध्ये कोणताही रासायनिक घटक मिसळू नये. वर्मीवॉश दीर्घकाळ साठवून ठेऊ नये. तयार झाल्यानंतर १५ दिवसाच्या अंत याचा वापर करावा. तयार झालेले वर्मीवॉश थंड किंवा कोरड्या जागी ठेवावे. भर उन्हात किंवा मोकळ्या हवेत याची साठवणूक करू नये. शक्यतो वर्मीवॉश हे सेपरेट वापरावे, यामध्ये इतर कोणताही घटक मिसळू नये.

## जनावरांच्या आवडीचा पौष्टिक चारा : ‘लसूण घास’

द्विदलवर्गीय, जनावरांच्या आवडीचा पौष्टिक चारा पीक म्हणजे ‘लसूण घास’. या चाऱ्याला इंग्रजीत ‘ल्युसर्न’किंवा ‘अल्फाल्फा’या नावाने सुद्धा ओळखतात. लसूण घास चाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने,काष्ठमय तंतू, कर्बोदके आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळतात. या चाऱ्यामध्ये १८ ते २० टक्के प्रथिने, २.० टक्के स्निग्धांश, २५ टक्के तंतू, २९ टक्के कर्बोदके, सूक्ष्म अन्नद्रव्ये, उपयुक्त आम्ले तसेच अ आणि ड जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या चारा पिकाला विशेष महत्व आहे. हे पीक तीन वर्षापर्यंत शेतात टिकते. दरवर्षी १२ ते १५ कापण्या मिळतात ज्यातून सरासरी १०० ते १२५ टन हेक्टरी हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते.

जमीन :या चारा पिकाला मध्यम ते भारी, चांगला निचरा होणारी, तसेच सामू ७.५ ते ८ दरम्यान असणारी जमीन चांगली मानवते. ऑक्टोबर- नोव्हेंबर हा कालावधी लागवडीसाठी योग्य समजला जातो. हे पीक जमिनीत तीन वर्षांपर्यंत टिकणारे असल्यामुळे जमिनीची चांगली मशागत करावी लागते.

खत व्यवस्थापन :या पिकास भरपूर प्रमाणात भरखते व वरखते देणे गरजेचे आहे. मशागतीच्या वेळी हेक्टरी १५ ते २० टन शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीपूर्वी २० किलो नत्र, १०० किलो स्फुरद व ५० किलो पालाश या रासायनिक खतांची प्रति हेक्टरी मात्रा द्यावी. त्यानंतर दर तीन ते चार कापण्यांनंतर हेक्टरी ५० किलो स्फुरद खताची मात्रा द्यावी. लागवडीसाठी आरएल-८८, आनंद-२, आनंद-३, को-१ सुधारित जातींची निवड करावी. ओळीत पेरणी केल्याने खते देणे सोपे जाते. हात कोळप्याने आंतरमशागत करता येते.

पेरणी पद्धत :ओळीत बियाणे पेरणी करण्या अगोदर जमिनीमध्ये वाफे तयार करून घ्यावेत, जमिनीच्या उतारानुसार साधारणपणे ३ ते ५ मीटर रुंद व १० मीटर लांबीचे वाफे तयार करावेत. त्यानंतर एक फूट अंतरावर काकऱ्या पाडाव्यात. दोन ओळींत एक फूट अंतर ठेवून ओळीत बियाणे पेरणी केली असता हेक्टरी २५ किलो एवढेच बी पुरेसे होते. ओळीतील पेरणीमुळे हातकोळपणी यंत्राने कमी खर्चात तणनियंत्रण करता येते. पेरणीपूर्वी १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम रायझोबियमची बीजप्रक्रिया करावी.


सिंचन :बी पेरल्यानंतर पहिले पाणी हळुवार द्यावे. जमिनीच्या मगदुरानुसार पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. तुषार सिंचनाने पाणी देणे फायद्याचे ठरते.


कापणी :लसूण घासाची पहिली कापणी पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी करावी. पहिल्या कापणीनंतर दर २२ ते २५ दिवसांनी कापणी करावी. कापणी जमिनीपासून ५ ते ६ सें.मी. उंचीवर करावी. कापणी करताना पीक उपटून येणार नाही याची काळजी घ्यावी. शेवटच्या कापणीनंतर पिकाला ५ ते ६ दिवस पाण्याचा ताण देऊन खुरपणी करावी. पाणी देण्यापूर्वी हेक्टरी १०० किलो स्फुरदची मात्रा द्यावी. पाणी देऊन पीक बियाण्यासाठी सोडावे.

लसूण घासाचे पीक ५० टक्के फुलोऱ्यात आल्यानंतर २ टक्के डाय अमोनियम फॉस्फेटची फवारणी करावी. त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने पुन्हा २ टक्के डाय अमोनियम फॉस्फेटची दुसरी फवारणी करावी. यामुळे बियाणे उत्पादनात २० टक्के वाढ होते.



## वेलवर्गीय काशीफळाची लागवड







पूर्वी परसबागेत किंवा शेतात कुठेतरी बांधावर, कोपऱ्यातील मोकळ्या जागेत काशीफळाच्या एक दोन वेलीची लागवड केली जाई. बहुतांश वेळी आपोआप बिया पडून उगवून येणारे हे दुर्लक्षित वेलवर्गीय वनस्पती आहे. पण गेल्या काही वर्षापासून उपयुक्त खाद्य म्हणून विशेष करून शेतामध्ये लागवड होऊ लागली आहे.

जाती : काशीफळाच्या जवळपास ३० प्रजातींपैकी कुकुरबिटा पेपो, कुकुरबिटा मोशाटा, कुकुरबिटा मॅक्सिमा, कुकुरबिटा अग्रीरोस्पर्मा, कुकुरबिटा फिसिफोलिया या जातींची लागवड केली जाते. रंगाने आणि आकाराने वेगवेगळ्या प्रजाती काशीफळ पिकात उपलब्ध आहेत. याशिवाय सुधारित वाण दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेने पुसा विश्वास या जातीची शिफारस केली आहे. पुसा विकास, पुसा हायब्रीड १, अर्का सूर्यमुखी, अर्का चंदन, काशी हरित, काशी शिशिर एफ, आनंद पंपकीन १, को १, को २ या जातीही उपलब्ध आहेत. याशिवाय १ किलोपासून ३०-३५ किलो वजनापर्यंत वाढणारे काळा, मोठा गर्द हिरवा, मोठा गोल, चपटा हिरवा, पिवळा, लाल अशा विविध प्रकारांच्या काशीफळाचे संकरित वाण उपलब्ध आहेत.

हवामान : सुरुवातीच्या काळात चांगल्या वाढीसाठी किमान १८ अंश सेल्सिअस तापमान गरजेचे आहे. या पिकास उष्ण हवामान चांगले मानवते. वाढलेली थंडी या पिकाला उपयुक्त ठरते. सरासरी तापमान २५-३५ अंश सेल्सिअस लागवडीसाठी उपयुक्त आहे. कमाल तापमान ४० अंशापर्यंत, तर किमान १८ अंशांपर्यंत असावे. जास्त तापमानात नर फुलांची संख्या वाढून मादी फुलांची संख्या कमी होते. त्यामुळे उत्पादनामध्ये घट येते.

लागवडीसाठी हंगाम : उन्हाळी हंगामात जानेवारी ते मार्च दरम्यान लागवड केली जाते. तर खरीप हंगामात जून-जुलैमध्ये २ ते ३ चांगला पाऊस झाल्यानंतर लागवड करावी.उन्हाळी हंगामाच्या तुलनेत खरीप हंगामात अधिक उत्पादन मिळते. रब्बी हंगामामध्ये तुलनेने उत्पादन कमी येते. अशी लागवड फायदेशीर ठरत नाही. हरितगृहामध्ये नियंत्रित वातावरणामध्ये रब्बीतही लागवड करणे शक्य आहे.

लागवडीचे अंतर : जमिनीचा पोत बघून दोन ओळींतील अंतर ६ किंवा ८ फूट आणि दोन वेलींतील अंतर ३ किंवा २ फूट ठेवावे. बियाणे २ ते २.५ सेंमी पेक्षा जास्त खोल टोकू नये. हलकी ते मध्यम स्वरूपाची पोयटा माती, सेंद्रिय पदार्थ युक्त व निचऱ्याची जमीन चांगल्या वाढीस उपयुक्त आहे. जमिनीचा सामू ६-७ पर्यंत असावा.

काढणी : हे पीक १०० ते १२० दिवसात तयार होते. दोन अवस्थांमध्ये काशीफळांची काढणी केली जाते. अपरिपक्व फळ हे भाजीसाठी वापरतात. पूर्ण परिपक्व झालेले फळ हे गोड पदार्थ व जास्त दिवस साठवून ठेवण्यासाठी वापरले जाते. साधारपणे ९० दिवसांपासून विविध वाणांची फळे काढणीस येतात. पिकाची काढणी जातिपरत्वे पिकाचा कालावधी पूर्ण झाल्यावर करावी. काढणी करताना फळाला १ इंच देठ ठेऊन तोडणी करावी.

उत्पादन : २० ते ४५ टन प्रति हेक्टर. वेगवेगळ्या प्रकारच्या फळानुसार दर मिळतो. एका वेलीवर दोन फळ अशाप्रकारे नियोजन केल्यास फळांचे वजन चांगले मिळते. जितके जास्त वजन तितकी अधिक मागणी बाजारपेठेमध्ये असते. स्थानिक बाजारांसोबत अन्य राज्यातील व्यापाऱ्याकडूनही मोठ्या प्रमाणात व वर्षभर मागणी असते.

## दिन विशेष

**जागतिक दिवस**
**जागतिक व्याघ्र दिन**
**विषमता विरोधी दिन**

### महत्वाच्या घटना

१८५२ : पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर कँडी यांच्या हस्ते विश्रामबागवाड्यात स्त्रीशिक्षणाचे भारतीय उद्गाते म्हणून जोतीबा फुले यांचा सन्मान करण्यात आला.
१८७६ : फादर आयगेन ला फॉन्ट आणि डॉ. महेन्द्र सरकार यांनी ’इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स’ या संस्थेची स्थापना केली.
१९२० : जगातील पहिली हवाई टपाल सेवा अमेरिकेतील न्यूयॉर्क ते सानफ्रान्सिस्को या शहरांमधे सुरू झाली.
१९२१ : ॲडॉल्फ हिटलर नॅशनल सोशलिस्ट जर्मन वर्कर्स पार्टीचे नेते बनले.
१९४६ : टाटा एअरलाइन्सचे ’एअर इंडिया’ असे नामकरण करण्यात आले.
१९४८ : दुसऱ्या महायुद्धामुळे पडलेल्या १२ वर्षांच्या खंडानंतर लंडन येथे १४ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९५७ : ’इंटरनॅशनल ॲटॉमिक एनर्जी एजन्सी ’ची स्थापना झाली.
१९८५ : मल्याळम लेखक टी. एस. पिळ्ळे यांना ज्ञानपीठ पुरस्कार
१९८७ : भारताचे पंतप्रधान राजीव गांधी व श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष जे. आर. जयवर्धने यांनी भारत-श्रीलंका शांतता करारावर सह्या केल्या.
१९९७ : कलकत्त्याच्या वंगीय साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणार्या साहित्यिक हरनाम घोष स्मृतीचिन्हासाठी दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांची निवड. अखिल भारतीय स्तरावरील हा पुरस्कार मराठी साहित्यिकास प्रथमच मिळाला.
२०२१ : आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक रशियन मॉड्यूल नौकाच्या इंजिनातील बिघाडानंतर तात्पुरते नियंत्रणाबाहेर गेले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८३ : बेनिटो मुसोलिनी इटलीचा हुकूमशहा (मृत्यू: २८ एप्रिल १९४५)
१८९८ : नोबेल पारितोषिक विजेते भौतिकशास्त्रज्ञ इसिदोरआयझॅक राबी यांचा जन्म.
१९०४ : जहांगीर रतनजी दादाभॉय तथा ’जे. आर. डी. टाटा’ भारतरत्न, उद्योगपती व वैमानिक, भारतीय नागरी विमान वाहतुकीचे जनक (मृत्यू: २९ नोव्हेंबर १९९३)
१९२२ : ब. मो. पुरंदरे इतिहासकार आणि लेखक, शिवशाहीर
१९२५ : शि. द. फडणीस व्यंगचित्रकार
१९३७ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ डॅनियेल मॅकफॅडेन यांचा जन्म.
१९५३ : अनुप जलोटा भजनगायक
१९५९ : संजय दत्त अभिनेता व गुन्हेगार
१९८१ : फर्नांडो अलोन्सो स्पॅनिश रेस कार ड्रायव्हर

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२३८ : बाल्बिनस रोमन सम्राट (जन्म: १६५)
११०८ : फिलिप (पहिला) फ्रान्सचा राजा (जन्म: २३ मे १०५२)
१७८१ : योहान कीज जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (जन्म: १४ सप्टेंबर १७१३)
१८५६ : मधे विधवा विवाहाचा कायदा आला. (जन्म: २६ सप्टेंबर १८२०)
१८९० : व्हिन्सेंट व्हॅन गॉग डच चित्रकार (जन्म: ३० मार्च १८५३)
१८९१ : इश्वरचन्द्र विद्यासागर बंगाली समाजसुधारक, तत्त्वज्ञ, लेखक, शिक्षणतज्ञ व उद्योजक. यांच्या प्रयत्नांमुळेच
१९०० : इटलीचा राजा उंबेर्तो पहिला यांचे निधन.
१९८७ : भारतीय लेखक, कवी आणि नाटककार बिभूतीभूशन मुखोपाध्याय यांचे निधन. (जन्म: २४ ऑक्टोबर १८९४)
१९९४ : नोबेल पारितोषिक विजेती ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ डोरोथीक्रोफूट हॉजकिन यांचे निधन.
१९९६ : अरुणा असफ अली स्वातंत्र्यसेनानी. ९ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर तिरंगा फडकवला होता. लेनिन शांतता पुरस्कार, इंदिरा गांधी शांतता पुरस्कार, पद्मविभूषण, आंतरराष्ट्रीय सद्भावना पुरस्कार, भारतरत्न (मरणोत्तर) इ. पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (जन्म: १६ जुलै १९०९)
२००२ : सुधीर फडके ऊर्फ ’बाबूजी’ गायक व संगीतकार (२५ जुलै १९१९)
२००३ : बद्रुद्दीन जमालुद्दीन काझी उर्फ ’जॉनी वॉकर’ विनोदी अभिनेता (जन्म: ११ नोव्हेंबर १९२६)
२००६ : डॉ. निर्मलकुमार फडकुले मराठी संत साहित्यातील विद्वान (जन्म: १६ नोव्हेंबर १९२८)
२००९ : महाराणी गायत्रीदेवी जयपूरच्या राजमाता (जन्म: २३ मे १९१९)
२०१३ : भारतीय क्रिकेटरपटू मुनीर हुसेन यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९२९)

## ऊस पिकावरील तांबेरा रोगाचे व्यवस्थापन

महाराष्ट्रामध्ये आडसाली हंगामासाठी लागवड केलेल्या सर्व प्रचलित जातींवर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असतो. अनुकूल वातावरणामुळे आडसाली उसामधील ऊस संख्या, कांड्याची लांबी व गोलाईवर या रोगाचा परिणाम होतो. साहजिकच ऊस उत्पादन व उत्पादकतेवर परिणाम दिसून येतो. लागवडीसाठी रोगग्रस्त बेण्याचा वापर, नियंत्रण उपाययोजनांचा वेळीच अवलंब न करणे यामुळे उसावरील रोगाचे प्रमाण वाढते. उसाचे हेक्टरी उत्पादन वाढविण्यासाठी तांबेरा रोगाचे सामूहिकरित्या प्रभावी व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

काय असतात तांबेरा रोगाचे लक्षण : उसाच्या पानावर तांबेरा हा रोग पुनक्सिनिया मिल्यानोसेफिला व पुक्सिनिया कुहिनीय या दोन बुरशींमुळे होतो. ही बुरशी फक्त ऊस पिकावर उपजीविका करते. आधी बुरशीचा प्रादुर्भाव पानांच्या दोन्ही बाजूस होऊन पानावर लहान, लांबट आकारांचे पिवळे ठिपके दिसतात. कालांतराने ठिपके लालसर तपकिरी होतात. ठिपक्यांचा भोवती फिकट पिवळसर हिरवी कडा तयार होते. पानांच्या खालच्या बाजूस ठिपक्यांच्या जागेवर उंचवटे तयार होतात.







# मोंढा येथे गोडाऊन फोडुन सोयाबीन चोरी करणाऱ्या टोळी पकडली

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील नविन मोंढ्यामध्ये असलेले भक्ती एक्सेट्रेशन प्रा. लि. कंपनीचे गोडाऊन फोडुन त्यातील सोयाबीन चोरी झाल्याची घटना २३ जुलै रोजीच्या रात्री घडली होती. त्यावरुन मॅनेजर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे चंदनझिरा येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मा. पोलीस अधीक्षक श्री. तेगबीरसिंह संधु यांनी सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांना सुचना दिल्या होत्या. त्यावरुन पोस्टे चंदनझिरा चे पथकाने तपासाची चक्रे फिरवुन तांत्रीक व गुप्त माहीती काढुन जालना शहरातील १) शेख अब्दुल शेख हारुन रा. हिंदनगर नविन मोंढा जालना २) वैभव भास्कर लांडगे रा. कन्हैय्यानगर जालना ३) किशोर किसन फुलवाडे रा. कन्हैय्यानगर जालना ४) एक विधी संघर्षग्रस्त बालक यांना दिनांक २३/०७/



२०२६ रोजी ताब्यात घेवुन त्यांचे कडे गुन्हयाचा तपास केला असता नमुद आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने आरोपी क्र १ ते ३ यांना अटक करुन त्यांची चार दिवसांची पोलीस कोठडी घेण्यात आली. पोलीस कोठडीमध्ये त्यांचे कडुन चोरलेले सोयाबीन जप्त करण्यात आले आहे. काही सोयाबीन नविन मोंढा येथील व्यापाऱ्यांना विक्री केले असल्याचे सांगीतल्याने चोरीचा माल घेणारे व्यापारी १) अशरफखान ईस्माईलखॉन रा. खांडसरी जालना २) गजानन बंडेराव सोनवणे रा. वडीवाडी ता. जि. जालना यांचे कडुन जप्त करण्यात आले आहे. आरोपींकडुन एकुण १ लाख १४ हजार रुपये किंमतीचे २१ क्विटल ५० किलो सोयाबीन जप्त करण्यात आले तसेच आरोपींनी सोयाबीन चोरीसाठी वापरलेली ९० हजार रुपये किंमतीची रिक्शा जप्त करण्यात आली आहे. अटक आरोपींकडुन नविन मोंढा भागातील धान्य चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. अधिक तपास हेड कॉन्स्टेबल संदीप उगले हे करीत आहेत. सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंह संधु , मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. विक्रम साळी , यांचे मार्गदर्शनाखाली चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब पवार, पोउपनि दिगंबर पवार, पोहेकॉ कृष्णा तंगे, समाधान उगले, विशाल लोखंडे, अभिजीत वायकोस, सागर खैरे, गजानन काकडे, चालक सुभाष नागरे व स्थागुशाचे पोहेकों सागर बावस्कर यांनी केली आहे.

## आरोग्य हीच खरी सेवा; जामखेडमध्ये वैद्यकीय कक्ष लवकरच : आकाश बाफना

### तपनेश्वर शाळेला शिवसेनेकडून प्रथमोपचार किटचे वाटप

जामखेड। प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शाळांमध्ये प्रथमोपचाराची सुविधा उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक असून, आरोग्याच्या समस्या उद्भवल्यास प्रथमोपचार किटमुळे तातडीने मदत मिळू शकते. या उद्देशाने जामखेड तालुक्यातील शाळांना प्रथमोपचार पेट्यांचे वाटप सुरू करण्यात आहे , अशी माहिती युवा नेते आकाश बाफना यांनी दिली. शिवसेना महाराष्ट्र राज्याचे पक्ष सचिव राम रेपाळे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्यदूत मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली, युवा नेते आकाश बाफना यांच्या संकल्पनेतून तसेच सामाजिक कार्यकर्त्या पायलताई बाफना मित्र परिवार आणि शिवसेना जामखेड तालुका यांच्या वतीने शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तपनेश्वर तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मुले व मुली) येथे प्रथमोपचार पेट्यांचे मंगळवार दिनांक २८ जुलै रोजी वाटप करण्यात आले.




यावेळी बोलताना आकाश बाफना म्हणाले,पुढील काळात जामखेड शहरासह तालुक्यात आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठी विविध सेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा संकल्प आहे.

सर्वसामान्य नागरिकांना वैद्यकीय मदत व मार्गदर्शन मिळावे यासाठी जामखेड शहरात लवकरच शिवसेना वैद्यकीय कक्ष सुरू करण्यात येणार आहे. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनराज पवार,शिवसेना नेते पांडुरंग माने, स्वप्निल खाडे, विकी पिंपळे, अशोक कुमटकर, दत्तात्रय जगताप,ज्येष्ठ शिक्षिका जयश्री मुकणे, मुख्याध्यापक मच्छिंद्र खैरे, उपाध्यापिका जयश्री पाटील, मंगल सोलंकर, माता-पालक रेखा बळे, पूजा कुलकर्णी,गीता जिरेकर, कविता भोसले, नीता भोसले, शितल क्षिरसागर,व अंगणवाडी सेविका शुभांगी अडाले, शिवकन्या राजगुरू तसेच पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुख्याध्यापक मच्छिंद्र खैरे यांनी केले, तर आभारप्रदर्शन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनराज पवार यांनी केले.

## हिंगोलीतील लिगो प्रकल्पाजवळील निर्बंध लवकरच शिथिल होणार?

### जिल्हाधिकारी आणि उद्योजकांसोबत महत्त्वपूर्ण बैठक



हिंगोली। प्रतिनिधी

औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे दुधाळा येथे प्रस्तावित लिगो इंडिया प्रकल्पाच्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार लागू करण्यात आलेल्या विविध विकासकामांचे निर्बंध शिथील करण्याच्या मागणीवर लिगो एम्पावर्ड बोर्डाच्या बैठकीत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन अणुऊर्जा व संशोधन विकास विभागाचे संचालक नितीन जावळे यांनी सोमवारी ता. २७ दिले आहे. येथील जिल्हाधिकारी कार्यालयात लिगो प्रकल्पाच्या पार्श्वभुमीवर बैठक झाली. यावेळी अणुऊर्जा संशोधन व विकास विभागाचे संचालक नितीन जावळे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, लिगो इंडिया प्रकल्प समन्वयक समीर जाधव, जिल्हा खनिकर्म अधिकारी आश्विनकुमार माने, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक रविंद्र पत्की, उद्योग समूह संघटनेचे ज्ञानेश्वर मामडे, प्रविण सोनी, नितीन राठोड, रमेश पंडित तसेच जिल्ह्यातील स्टोन क्रशर उद्योजकही बैठकीस उपस्थित होते.

या बैठकीत लिगो इंडिया प्रकल्पाच्या सीमारेषेपासून पाच ते ६० किलो मिटर परिसरात लागू असलेल्या विविध निर्बंधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. स्टोन क्रेशर, खाणकाम, ब्लास्टिंगवर आधारित उद्योग, २० अश्वशक्तीपेक्षा अधिक ऊर्जा लागणारे रेसिप्रोकेटिंग क्रियाकल्प, नवीन वीज प्रकल्प, नवीन रेल्वे मार्ग तसेच पवनचक्की उभारणीवरील निर्बंधांबाबत सखोल चर्चा करण्यात आली. हिंगोली जिल्ह्याच्या औद्योगिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळावी, यासाठी लिगो इंडिया प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत संबंधित निर्बंध शिथिल करण्यात यावेत तसेच काही निर्बंधांमध्ये अंशतः सूट देण्यात यावी, अशी विनंती जिल्हा प्रशासन व उद्योग समूहाच्या वतीने करण्यात आली. यावर संचालक नितीन जावळे यांनी जिल्हा प्रशासन व उद्योग प्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांवर लिगो इंडिया एम्पावर्ड बोर्डाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन दिले. त्यानंतर जावळे यांच्या पथकाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यासमवेत लिंबाळा एमआयडीसी परिसरातील कीर्ती गोल्ड, शिवपार्वती ऑईल मिल तसेच पंचतत्त्व उद्योगांना भेट देऊन उत्पादन प्रक्रिया, बाटली निर्मिती व पाणी शुद्धीकरण प्रक्रियेची पाहणी केली. तसेच औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे दुधाळा येथील प्रस्तावित लिगो इंडिया प्रकल्प स्थळालाही भेट देऊन तेथील परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

## भविष्य निर्वाह निधीचे (जीपीएफ) वार्षिक विवरणपत्र सेवार्थवर उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

महालेखाकार (लेखा व हक्क)२, महाराष्ट्र, नागपूर यांनी महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ) खात्यांचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे वार्षिक विवरणपत्र सेवार्थ प्रणालीवर उपलब्ध करून दिले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी आपल्या जीपीएफ खात्याची माहिती काळजीपूर्वक तपासून आवश्यक त्रुटींची तातडीने दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी लेखे प्रधान महालेखाकार (लेखा व हक्क)२, नागपूर कार्यालयाकडे आहेत, त्यांना सेवार्थ पोर्टलवर वार्षिक विवरणपत्र पाहणे, डाउनलोड करणे तसेच त्याची प्रिंट काढणे शक्य आहे. वेळेत माहितीची पडताळणी केल्यास निवृत्तीच्या वेळी भविष्य निर्वाह निधीची रक्कम मंजूर करण्यात होणारा अनावश्यक विलंब टाळता येणार आहे.

महालेखाकार कार्यालयाकडे जीपीएफ लेखे असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सेवार्थ प्रणालीमध्ये स्वतःचा मोबाईल क्रमांक अद्ययावत ठेवावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. जीपीएफशी संबंधित ओटीपी तसेच अन्य महत्त्वाचे संदेश नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरच पाठविले जाणार असल्याने ज्यांचा मोबाईल क्रमांक अद्याप नोंदणीकृत नाही, त्यांनी आवश्यक तपशीलासह संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा.याशिवाय, वार्षिक विवरणपत्रातील नाव, जन्मतारीख व इतर वैयक्तिक माहिती अचूक असल्याची खात्री करून घ्यावी. कोणतीही तफावत आढळल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्या माध्यमातून सेवार्थ आयडीसह आवश्यक कागदपत्रे सादर करून दुरुस्ती करून घ्यावी. सेवार्थ पोर्टलवर लॉगिन करण्यासाठी मोबाईल क्रमांक नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. आयडी किंवा पासवर्ड उपलब्ध नसल्यास या पर्यायाचा वापर करून नवीन संकेतशब्द तयार करता येईल.

तसेच कर्मचाऱ्यांनी आपल्या जीपीएफ खात्यात मासिक अभिदानाची नोंद नियमितपणे तपासावी. अभिदानाची रक्कम खात्यात जमा न झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांमार्फत कोषागार प्रमाणपत्र, चलन क्रमांक, दिनांक आणि आवश्यक कागदपत्रांसह माहिती सादर करावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांनी वेळेत माहितीची पडताळणी करून आवश्यक त्रुटी दूर कराव्यात, जेणेकरून निवृत्तीच्या वेळी भविष्य निर्वाह निधीची रक्कम मंजूर करताना कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, असे आवाहन महालेखाकार (लेखा व हक्क)२, महाराष्ट्र, नागपूर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.आवश्यक असल्यास हा मजकूर वृत्तपत्रीय शैलीत अधिक संक्षिप्त किंवा शासनाच्या प्रसिद्धीपत्रकाच्या मानक स्वरूपातही तयार करून देऊ शकतो.

## सिद्धी कुटेचे शिष्यवृत्ती परिक्षेत घवघवीत यश




बीड/प्रतिनिधी

तालुक्यातील कुक्कडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थीनी सिद्धी चंद्रकांत कुटे हिने २२२ गुण मिळवत शिष्यवृत्ती परिक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल तिचे सर्वांनी अभिनंदन केले आहे.

कुक्कडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. शिक्षकांकडून दैनंदिन अध्यापनासह विशेष शिकवणीही केली जाते. यासाठी पालक व शाळा व्यवस्थापन समितीही अग्रही असते. याचे चांगले परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर दिसून येतात. या शाळेतील विद्यार्थीनी सिद्धी चंद्रकांत कुटे हिने सातत्याने सराव करत शिष्यवृत्ती परिक्षेत प्रथम क्रमांक पटकावत शिष्यवृत्तीस पात्र ठरली. शाळेतील विद्यार्थीनी शरयू शशीकांत कुटे १९२, प्रियल गणेश पवार १२२, साक्षी गणेश खंडागळे हिने १७६ गुण मिळवत यश संपादन केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे राजाभाऊ महाराज कुटे, भाऊसाहेब जरांगे पाटील, दिनेश गुळवे, राहुल लोंढे, अप्पासाहेब महानोर, देविदास चव्हाण, बालासाहेब शेरकर, संजय जाधव, बालासाहेब कोळेकर, ज्ञानेश्वर शेरकर, देविदास अण्णा वाणी, नंदकुमार शिंदे, संतोष भारती, काशीनाथ जोगदंड, गणेश कोळेकर यांच्यासह शिक्षक, पालक, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## पाथर्डी नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीला स्व.लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे नाव देण्याची मागणी



पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पर्यावरण पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत थोड्याच दिवसात होणार असल्याने त्यापूर्वीच पाथर्डी नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीला लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे नाव देण्याची मागणी जोर धरू लागली आहे पुढील काही दिवसात दसरा आणि दिवाळीच्या धामधुमीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या उर्वरित राहिलेल्या महानगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुका होणार आहेत तुर्तासतरी पाथर्डी तालुक्याचा राजकीय आलेख पाहता जिल्हा परिषद पंचायत समिती या निवडणुकीत भाजपा राष्ट्रवादी शरद पवार आणि राष्ट्रवादी अजित पवार या पक्षांची त्रिशंकू निवडणूक होण्याची दाट शक्यता आहे गेल्या पंधरा वर्षात पाथर्डी नगरपालिकेवर भाजपचा बोलबाला राहिला असल्याने पाथर्डी नगरपालिकेत नगराध्यक्ष म्हणून अभय आव्हाड विराजमान आहेत यामुळे पालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीस लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे नाव देण्याचा ठराव पाथर्डी नगरपालिकेने पारित करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

लोकनेते गोपीनाथ मुंडे हे पाथर्डीला मावशी संबोधायचे एका अर्थाने पाथर्डी शेवगाव मतदार संघ दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी दत्तक घेतला होता या मतदारसंघावर तब्बल पंधरा वर्षापासून भाजपचा आमदार निवडून येत आहे यामध्ये मुंडे कुटुंबांचे योगदान असल्याने पालिकेच्या प्रशासकीय इमारतीला लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे नाव देण्यास कोणीही विरोध करू नये अन्यथा केवळ मताच्या राजकारणासाठी मुंडे यांचा वापर केला जातो असा संदेश मतदारसंघात जाईल याचे परिणाम भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत लोकप्रतिनिधींना भोगावे लागतील. ( प्रा.सुनील पाखरे)

# सरकारची दोन लाखांची कर्जमाफी कागदावरच?

## १.५४ लाखांच्या कर्जावर अवघी ९४ हजारांची माफी, धाराशिवमध्ये शेतकरी संतप्त

धाराशिव। प्रतिनिधी

राज्य शासनाने दोन लाख रुपयांपर्यंतच्या शेतकरी कर्जमाफीची मोठी घोषणा केली असली, तरी प्रत्यक्षात जमिनीवर या योजनेच्या अंमलबजावणीत मोठा गोंधळ सुरू असल्याचा दावा धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केला आहे. तुळजापूर तालुक्यातील गंधोरा गावात कर्जमाफीच्या यादीतील तफावतीमुळे शेतकरी संतप्त झाले आहेत. १.५४ लाखांच्या कर्जावर अवघी ९४ हजारांची माफी देण्यात आल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. दोन लाखांपर्यंतच्या कर्जाची थकबाकी असतानाही प्रत्यक्ष यादीत अत्यंत कमी रक्कम माफ झाल्याचे दिसून येत असल्याने, ''ही कर्जमाफी म्हणजे निव्वळ जुमला आहे,'' असा घणाघाती आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. गंधोरा गावातील २३३ शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या यादीत पात्र ठरवण्यात आले आहे. मात्र, त्यापैकी तब्बल ८० टक्के शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या रकमेत मोठा घोळ असल्याचा दावा गावकऱ्यांनी केला आहे. संतप्त शेतकऱ्यांनी थेट बँकेचे पासबुक माध्यमांसमोर पुरावा म्हणून दाखवत



प्रशासनाच्या कारभाराचे वाभाडे काढले.

गंधोरा येथील शेतकरी जीवन विष्णू पाटील यांच्यावर 'बँक ऑफ महाराष्ट्र'चे १ लाख ५४ हजार ७३८ रुपये कर्ज थकीत आहे. दोन लाखांच्या आतील कर्ज असल्याने पूर्ण कर्ज माफ होणे अपेक्षित होते; परंतु, सरकारच्या यादीत त्यांना अवघ्या ९४ हजार ४२७ रुपयांचाच लाभ मंजूर झाला आहे. विशेष म्हणजे, ''उरलेले ६० हजार रुपये जमा केल्याशिवाय या ९४ हजारांची कर्जमाफी लागू होणार नाही,'' असे उत्तर बँक अधिकाऱ्यांकडून दिले जात असल्याचे पाटील यांनी सांगितले. पावसाच्या लहरीपणामुळे यंदा पेरणी झालेली नाही, त्यातच मुलांच्या शिक्षण आणि दैनंदिन खर्चाचा डोंगर समोर उभा आहे. अशा बिकट परिस्थितीत बँकेत ६० हजार रुपये भरायचे कुठून? असा सवाल शेतकरी विचारत आहेत. योजनेची योग्य दुरुस्ती करून सर्व पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंतचा पूर्ण लाभ मिळावा, यासाठी शेतकरी आता बँकेच्या फेऱ्या मारत आहेत. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील चिकलठाण येथील शेतकऱ्यांना कमी कर्जमाफी मिळाल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी केला आहे. चिकलठाण गावातील शेतकरी लक्ष्मीकांत खरे यांचे कर्ज २,०६,६०२ एवढे असताना सरकारच्या कर्जमुक्तीच्या यादीत १,२०,५६१ एवढीच रक्कम दाखवण्यात आली. उरलेली रक्कम कोण भरणार याचे उत्तर सरकार देणार का? अशी विचारणा अंबादास दानवे यांनी केली आहे. यातील रक्कम बँकांनी भरायची असल्याचे सांगून सरकारने धूळफेक करू नये. कर्जमुक्तीच्या क्रेडिट घेणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याचेही उत्तर द्यावे, अशी मागणी अंबादास दानवे यांनी केली आहे.

## सरळसेवा परीक्षा पारदर्शक पद्धतीने; गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासन सतर्क



छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

कामगार विभागामार्फत माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळातील निरीक्षक, लेखापाल आणि लघुटंकलेखक पदांच्या भरतीसाठी २९ व ३० जुलै २०२६ रोजी ऑनलाइन सरळसेवा परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. ही परीक्षा छत्रपती संभाजीनगर येथील आयऑन डिजिटल झोन, चिकलठाणा तसेच आयऑन डिजिटल झोन, आयसीईईएम कॉलेज कॅम्पस, वाळूज या दोन परीक्षा केंद्रांवर पार पडणार आहे.

परीक्षा शांततापूर्ण, सुरक्षित आणि पारदर्शक वातावरणात पार पडावी यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार परीक्षा केंद्र परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आवश्यक प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. कामगार आयुक्तालयाने उमेदवारांना आवाहन केले आहे की, ही परीक्षा मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) यांच्या माध्यमातून पूर्णपणे ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने घेण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षा, निवड किंवा गुण वाढवून देण्याचे आमिष दाखविणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेच्या भूलथापांना बळी पडू नये.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

बुधवार दि.२९ जुलै २०२६ 

## ना. पंकजाताई मुंडे याच्या सामाजिक दायित्वाच्या आवाहनाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद !

# हे माझ्यासाठी मोठे ऋण तयार झाले आहे - ना पंकजाताई मुंडे



परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आपला वाढदिवस खर्चिक व उत्सवी स्वरूपात साजरा न करता सामाजिक दायित्वाच्या उपक्रमातून साजरा करण्याच्या केलेल्या आवाहनाला राज्यभरातून उदंड व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.आपल्या वाढदिवसानिमित्त राज्यभर लोक कल्याणकारी, पर्यावरणपूरक,सामाजिक हिताचे उपक्रम राबवून केलेल्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल 'हे माझ्यासाठी मोठे ऋण तयार झाले आहे' अशा शब्दात लोककल्याणाच्या उपक्रमाबद्दल पंकजाताई मुंडे यांनी कृतज्ञ भावना व्यक्त केल्या आहेत.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी भावनिक शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली आहे. लोककल्याणाचा स्वीकारलेला मार्ग कोणत्याही परिस्थितीत न सोडण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. आपल्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांनी राज्यभर रक्तदान, वृक्षारोपण, अन्नदान, रुग्णसेवा, शैक्षणिक साहित्य वाटप आदी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले. वैयक्तिक सत्कार किंवा भव्य कार्यक्रमांऐवजी समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देण्याचे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी यापूर्वीच केले होते. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत राज्यभरात ठीकठिकाणी लोककल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी या आवाहनाला प्रतिसाद देत राबवलेल्या लोककल्याणकारी उपक्रमाबद्दल पंकजाताई मुंडे यांनी कार्यकर्त्यांचे कौतुक करत कर्तव्य भावना व्यक्त केली आहे.

### पंकजाताईंनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

परळी येथे नव्याने होत असलेल्या पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय उभारण्यासाठी १३ हेक्टर शासकीय जमीन विनामूल्य देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून तसा शासन आदेश महसूल व वन विभागाने निर्गमित केला आहे. दरम्यान या निर्णयाबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांचे आभार मानले आहेत.

### पंकजाताईंची आभाराची पोस्ट

सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे की, माझ्या वाढदिवसानिमित्त आपण लोककल्याणकारी कार्यक्रम राबवून माझ्यासाठी प्रार्थना केल्या. हे माझ्यासाठी मोठे ऋण तयार झाले आहे. मी सदैव ऋणात राहीन. मी उतरणार नाही, मी मातणार नाही आणि मी घेतलेला वसा टाकणार नाही.. दरम्यान, या संदेशातून त्यांनी समाजसेवेची बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली. जनतेचे प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद हेच आपली सर्वात मोठी ताकद असल्याचे सूचित करत लोकहितासाठी अविरत कार्यरत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

## धारूर शहर हे येणाऱ्या काळात मराठवाड्यातील एक आदर्श गाव म्हणून पुढे येईल–आ. प्रकाश सोळंके

किल्ले धारूर । प्रतिनिधी

अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्याची दुर्दैववी वेळ आपल्यावर आली आहे. परंतु अजितदादा यांच्या पश्चात त्यांना अपेक्षित असे काम धारूर येथील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी अजितदादांच्या पहिल्या जयंतीनिमित्त केले आहे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केला काम इतर नगरपालिकेतील कार्यकर्त्यांनी आदर्श घेण्यासारखे काम आहे त्यामुळे येणाऱ्या काळात मराठवाड्यातील एक आदर्श गाव म्हणून धारूर शहर पुढे येईल.



धारूर येथे स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने दि.२२ जूलै ते २८ जूलै दरम्यान जनसेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते या सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून आ.प्रकाश सोळंके बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगर परिषदेचे नगराध्यक्ष बाळसाहेब जाधव , माजी नगराध्यक्ष शेषराव फावडे, नगरसेवक लक्ष्मण सिरसट, यशवंत गायके, शिनगारे सर,माजलगाव विधानसभा अध्यक्ष श्री नरवडे, जिल्हा उपाध्यक्ष महादेव शिनगारे, गटनेते नितीन शिनगारे, नगरसेवक अवेज कुरेशी, डॉ मयूर सावंत,सय्यद हरून, सचीन जाधव, कृष्णा भावटनकर,गणेश सावंत, सुजित वैरागे, संजय फावडे,प्रवीन गायके व सुधीर शिनगारे हे उपस्थित होते.अजीत पवार हे शिस्तप्रिय व वेळेला महत्व देणारे नेते होते ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांच्या समस्या यासाठी झटणारा नेता म्हणून दादाची ओळख होती.दादांना आवडणाऱ्या गोष्टी जनसेवा सप्ताहाच्या माध्यमातून धारूर येथील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी करून दाखवल्या. धारूर शहरात जनसेवा सप्ताह अंतर्गत झालेली कामे ही लोकांना पटणारी आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने धारूरकरांनी दादांना श्रद्धांजली वाहिली आहे. अजितदादांच्या मनावर धारूरकरांनी काम करणारा माणूस निवडून दिला आहे स्वच्छ प्रतिमेचा कामाची आवड असलेला अध्यक्ष बाळासाहेब जाधव यांच्या रुपाने धारूर शहराला मिळाला आहे त्यामुळे येणाऱ्या काळात शहरातील अनेक ◀◀ पान ३ वर

## विषबाधेमुळे १० शेळ्यांचा मृत्यू अल्पभूधारक शेतकऱ्यावर संकट

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील हिंगणी (बु.) येथे विषबाधेमुळे १० शेळ्यांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना सोमवारी सायंकाळी घडली. या घटनेमुळे शेळीपालन करणारे अल्पभूधारक शेतकरी जनक लहुदास तंबुड यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाने तातडीने आर्थिक मदत करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**हिंगणी (बु.) येथील हृदयद्रावक घटना**

मिळालेल्या माहितीनुसार, जनक तंबुड हे शनिवारी नेहमीप्रमाणे आपल्या २५ शेळ्या हिंगणी शिवारात चारण्यासाठी घेऊन गेले होते. चारताना गवतावर पडलेले तणनाशक शेळ्यांच्या पोटात गेल्याने त्यांना विषबाधा झाली. सायंकाळी घरी परतत असताना दोन शेळ्या शेतातच दगावल्या, तर घरी आल्यानंतर आणखी आठ शेळ्यांचा मृत्यू झाला.

अचानक घडलेल्या या घटनेमुळे तंबुड कुटुंबीयांनी एकच हंबरडा फोडला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मंगळवारी पशुवैद्यकीय व महसूल विभागाच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. पीडित शेतकऱ्याला तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी हिंगणी ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे.

## उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक महोत्सवाचे यजमानपद तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजला ; विद्यापीठाच्या पाहणी समितीकडून पूर्वतयारीचा आढावा

### ३० व ३१ ऑगस्टला बीडमध्ये रंगणार एसएनडीटीचा भव्य विभागीय युवा महोत्सव

बीड । प्रतिनिधी

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित करण्यात येणारा 'उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक युवा महोत्सव २०२६' या वर्षी बीड येथील तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन येथे आगामी ३० आणि ३१ ऑगस्ट रोजी माननीय कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

या महोत्सवाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी विद्यापीठाच्या वरिष्ठ प्रतिनिधी मंडळाने नुकतीच तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन येथे भेट देऊन स्थळ पाहणी केली.





या प्रतिनिधी मंडळात विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे अधिष्ठाता डॉ. नितीन एस. प्रभु तेंडुलकर, सांस्कृतिक समन्वयक प्रा.किरण गायकवाड, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.साईनाथ बनसोडे आणि छत्रपती संभाजीनगर येथील जेएसपीएम महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामकिशन दहिफळे यांचा समावेश होता.

यावेळी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे, आयोजन समितीचे सदस्य, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. पाहणी समितीने स्पर्धा स्थळ, नोंदणी केंद्र, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, ग्रीन रूम, रंगमंच, ध्वनी व प्रकाश ◀◀ पान ३ वर

## ट्विंकलिंग स्टार इंग्लिश स्कूलमध्ये रंगला आषाढी एकादशीचा बाल दिंडी सोहळा

बीड । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या निमित्ताने वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, भक्तीभाव व सामाजिक मूल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने ट्विंकलिंग स्टार इंग्लिश स्कूल, शिवाजीनगर शाखेच्या वतीने बुधवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी भव्य बाल दिंडी सोहळ्याचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले.

डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात टाळ, वीणा आणि भगवे



झेंडे घेतलेले चिमुकले वारकरी विठ्ठल... विठ्ठल... च्या अखंड गजरात दिंडीत सहभागी झाले होते. टाळ–मृदंगाच्या निनादाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. दिंडी मार्गावर नागरिकांनी बालवारकऱ्यांचे तसेच शाळेच्या शिस्तबद्ध आयोजनाचे मनापासून कौतुक केले.

या कार्यक्रमाला शाळेचे चेअरमन श्री. गणेश मैड सर तसेच डॉ. केदार मॅडम (जिल्हा रुग्णालय, बीड) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते विधीवत पालखी पूजन व श्रीफळ वाढवून दिंडीला प्रारंभ करण्यात आला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना वारकरी परंपरेचे महत्त्व सांगत भक्ती, संस्कार आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचे आवाहन केले. तसेच विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक केले.

प्ले–ग्रुप ते इयत्ता चौथीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी या दिंडी सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. शाळेच्या प्रमुख अश्विनी वळे मॅडम ◀◀ पान ३ वर

## जायकवाडीचे पाणी त्वरित माजलगाव धरणात सोडा –भाई ॲड. नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाड्यातील मोठे धरण म्हणून पैठणच्या नाथ सागर कडे पाहिले जाते, गेल्या काही दिवसात नाशिक सह इतर जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे पैठणच्या नाथ सागर कालव्यात पाण्याची प्रचंड आवक वाढलेली असून लवकरच हे धरण शंभर टक्के जलसाठ्याकडे जाण्याची शक्यता निर्माण झाली असून सद्यस्थितीत पावसाळा पूर्णतः संपलेला नसल्याने आगामी काळात अतिवृष्टीची शक्यता नाकारता येत नाही, जर तशी परिस्थिती निर्माण झाली तर मराठवाड्यातील एकमेव असलेले धरण नाथ सागर ओव्हर फ्लो होऊन पाण्याची नासाडी होण्याची शक्यता निर्माण होत आहे, शासनाने भविष्यातील धोका ओळखून व मराठवाड्यात पूर परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी माजलगाव धरणात जायकवाडीचे पाणी सोडणे आवश्यक आहे, माजलगाव जलाशयातील आज घडीचा पाणीसाठा पाहता माजलगाव धरण १००% भरण्याची कोणतीही प्रथमदर्शी शक्यता नसल्यामुळे भविष्यातील माजलगाव सह जिल्हाभरात पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी शासनाने सतर्कतेने जायकवाडीचे पाणी माजलगाव धरणात सोडून भविष्यकाळातील पाण्याचा प्रश्न गंभीर होणार नाही याची काळजी घ्यावी अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते बीड जिल्हा चिटणीस भाई ड नारायण गोले पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे...



## संतोष सानप यांना ' समाजरत्न' पुरस्कार जाहीर; नाशिक येथे होणार गौरव

आष्टी । प्रतिनिधी

वंजारी सेवा संघ आणि न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था (महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा या वर्षाचा प्रतिष्ठित 'वंजारी समाजरत्न पुरस्कार' दैनिक लोकाशाचे आष्टी तालुका प्रतिनिधी तथा आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप यांना जाहीर झाला आहे. पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात येत आहे.



गेल्या २३ वर्षांपासून संतोष सानप हे पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात अत्यंत सक्रियपणे योगदान देत आहेत. समाजातील वंचित, शोषित व उपेक्षित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडत त्यांनी अन्यायाविरोधात सदैव आपला रोखठोक आवाज उठवला आहे. पत्रकारितेचे माध्यम हे केवळ बातम्यांपुरते ◀◀ पान ३ वर

## ना. अजितदादा पवार यांच्या निधनामुळे वाढदिवस साजरा करणार नाही, कार्यकर्त्यांनी सामाजिक उपक्रम राबवावेत-धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे विकासाची दृष्टी असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या दुःखत निधनाने मी यावर्षी वाढदिवस साजरा करणार नाही, परंतु कार्यकर्त्यांनी गोरगरिबांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबवावेत असे आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले.



याबाबत अधिक माहिती देताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्र पोरका झाला आहे. त्यांच्या निधनाने राज्याचे मोठे नुकसान झाले. बोलण्यात स्पष्ट वक्ते पणा आणि वेळेला महत्त्व देणारे नेते म्हणून त्यांची आगळीवेगळी ओळख होती. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री होते. ५ ऑगस्ट रोजी माझा वाढदिवस आहे. ना. अजितदादा यांच्या निधनामुळे मी साजरा करणार नाही. तसेच बीड जिल्ह्यामध्ये अत्यल्प पर्जन्यमानामुळे शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिक चिंतेच्या छायेत आहेत अशा परिस्थितीत वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे.

## लोकाभिमुख प्रशासनामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा; महाआरोग्य शिबिरासाठी जनजागृतीचे आवाहन –आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आष्टी येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व समाधान शिबिराला' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महसूल, ग्रामविकास, कृषी, सार्वजनिक आरोग्य आदी विविध विभागांच्या माध्यमातून हजारो नागरिकांना विविध शासकीय प्रमाणपत्रे, सनदा व योजनांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आला.

यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना आमदार सुरेश धस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियानामुळे प्रशासन अधिक गतिमान झाले आहे. लोकाभिमुख शासन व्यवस्थेमुळे नागरिकांची शासकीय कार्यालयांकडे होणारी धावपळ कमी झाली असून, विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ आता थेट सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचत आहे. आमदार धस यांनी सांगितले की, या अभियानामुळे जमिनीच्या मोजणीची प्रलंबित प्रकरणे मोठ्या प्रमाणात निकाली निघाली आहेत. घरकुल लाभार्थ्यांना वाळू सहज उपलब्ध होत असून पाणंद रस्त्यांच्या कामांनाही गती मिळाली आहे. शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले. संजय गांधी निराधार योजनेसह



इतर सामाजिक योजनांमध्ये केवळ पात्र लाभार्थ्यांनाच लाभ मिळावा, अपात्र लाभार्थ्यांना तातडीने वगळून पारदर्शक कारवाई करण्यात यावी, अशी सूचनाही त्यांनी प्रशासनाला केली. याचबरोबर ६ ऑगस्ट रोजी आयोजित महाआरोग्य शिबिराचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, यासाठी व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन करताना त्यांनी सांगितले की, या शिबिरातून गंभीर व असाध्य आजारांवरील उपचाराची संधी उपलब्ध होणार असल्याने प्रशासन व कार्यकर्त्यांनी गावागावात माहिती पोहोचवावी.

**दहा हजार लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे, पंधरा हजार सनदांचे वितरण**

उपविभागीय अधिकारी सीमा शेख यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियानांतर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुक्यातील सुमारे १० हजार लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रे तर १५ हजार सनदांचे वितरण करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी तिन्ही तालुक्यांतील तहसीलदार आणि विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

**महसूल शिबिरांच्या कामकाजाचा आढावा जाहीर करा – धोंडे**

शिक्षण महर्षी तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांनी यापूर्वी झालेल्या महसूल शिबिरांमधील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा कितपत झाला, याची आकडेवारी जाहीर करण्याची आवश्यकता व्यक्त केली. तलाठी आणि ग्रामसेवकांनी सज्जावर नियमित उपस्थित राहून शेतकऱ्यांची कामे वेळेत पूर्ण करावीत, तसेच शेतकऱ्यांना जास्तीत जास्त पीकविमा मिळावा यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

**तलाठ्यांच्या कामकाजावर नाराजी**

माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी काही ठिकाणी तलाठी सज्जावर उपस्थित राहत नसल्याची खंत व्यक्त केली. त्यांच्या अनुपस्थितीत काही प्रतिनिधींकडून नागरिकांकडे पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी गंभीर असून अशा प्रकारांना आळा घालण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

**फार्मर आयडीतील त्रुटी तातडीने दूर करा**

ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे यांनी शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमधील क्षेत्रफळ व सर्वे क्रमांकातील विसंगतीमुळे पीकविमा व अनुदान मिळण्यात अडचणी येत असल्याचे निदर्शनास आणले. प्रत्येक गावात विशेष शिबिरे घेऊन फार्मर आयडी अद्ययावत करण्याची मागणी त्यांनी केली.

तालुका कृषी अधिकारी गोरक्ष तरटे यांनी कृषी विभागाच्या योजनांची माहिती देताना सांगितले की, महाडीबीटी पोर्टलद्वारे पूर्णपणे ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने योजना राबविण्यात येत आहेत. आष्टी व पाटोदा तालुक्यातील सुमारे २,३०० शेतकऱ्यांनी अर्ज केले असून त्यापैकी १,५०० शेतकऱ्यांना सुमारे १३ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुरेश धस होते. व्यासपीठावर उपविभागीय अधिकारी सीमा शेख, शिक्षण महर्षी तथा माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिरूर (कासार) तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केले. सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी तर आभार पाटोदा तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांनी मानले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk